रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १६८
www.ramprahar.com

◆ रविवार, ४ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## काळोखे खून प्रकरणातील आरोपीला पुण्यात अटक



**पुणे :** खोपोलीतील माजी नगरसेवक मंगेश काळोखे यांच्या खून प्रकरणातील पसार आरोपीला वानवडी पोलिसांनी अटक केली आहे. हडपसरमधील हांडेवाडी भागात ही कारवाई करण्यात आली. आरोपी आणि त्याच्याबरोबर असलेल्या दोन मित्रांनी काळोखे यांची सुपारी घेऊन खून केल्याची कबुली दिली. खालीद खलील कुरेशी (वय २३, रा. सय्यदनगर, हडपसर) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. हडपसरमधील रामटेकडी औद्योगिक वसाहतीत एका ज्येष्ठ नागरिकाला मारहाण करून त्यांच्याकडील सोनसाखळी हिसकाविण्यात आली होती. या गुन्ह्याचा तपास करताना उमर नूर खान, साहिल हबीब फकीर यांना अटक झाली होती. दोघांची चौकशी करण्यात आली, तेव्हा आरोपी खालीद कुरेशी हा गुन्हा करून पसार झाल्याची माहिती त्यांनी दिली. त्यानंतर पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळल्या. अधिक तपास सुरू आहे.

### अंतरंग

कस्टमर केअरच्या नावाखाली महिलेला लाखोंचा गंडा/२

रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४

न्यूझीलंडविरुद्ध मालिकेसाठी टीम इंडिया जाहीर/८

### क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाचे भूमिपूजन

# महिला सक्षमीकरणाला प्राधान्य : मुख्यमंत्री





**सातारा : प्रतिनिधी**

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नायगाव येथे उभे राहणारे उचित स्मारक हे त्यांच्या कार्याची आठवण देईल. हे स्मारक केवळ वास्तू न राहता महिलांच्या सक्षमीकरणाचे प्रेरणास्थान ठरेल. स्मारकासोबत महिला प्रशिक्षण केंद्र उभारून महिलांना आत्मनिर्भर बनवण्याचा शासनाचा संकल्प आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि.३) केले.

नायगाव (ता. खंडाळा) येथे आयोजित क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५व्या जयंती कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. या वेळी त्यांच्या हस्ते सावित्रीबाईंच्या १४३ कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या भव्य स्मारकाचे भूमिपूजन तसेच महिला प्रशिक्षण केंद्राचे भूमिपूजन करण्यात आले.

कार्यक्रमाला विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, पालकमंत्री शंभूराज देसाई, ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे, मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर, आमदार डॉ. अतुल भोसले, मनोज घोरपडे, सचिन पाटील, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नायगावच्या सरपंच स्वाती जमदाडे आदी उपस्थित होते.

नायगावचे नाव सावित्रीबाई फुले यांच्या नावाने करण्याची मागणी या वेळी मुख्यमंत्र्यांकडे करण्यात आली. त्या अनुषंगाने ग्रामसभेने तसा निर्णय घेऊन ग्रामविकास विभागामार्फत पाठवल्यास त्याला विनाविलंब मान्यता देण्यात येईल, असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. इतर मान्यवरांनीही विचार मांडले.



## विकासकामांच्या जोरावर महायुती पनवेल मनपा निवडणूक जिंकणार

- **भाजप नेते अरुणशेठ भगत यांचा विश्वास**
- **प्रभाग १मध्ये प्रचाराचा शुभारंभ**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेल परिसराच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला आहे. त्यातून अनेक महत्त्वपूर्ण विकासकामे पूर्ण झाली. ही कामे जनतेपर्यंत पोहचवणे कार्यकर्त्यांची मुख्य जबाबदारी आहे. विकासकामांच्या जोरावर आपण जनतेपुढे जात असून महापालिका निवडणूक जिंकू, असा विश्वास भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी प्रभाग क्रमांक १मध्ये व्यक्त केला.

पनवेल महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय महायुतीचे प्रभाग क्रमांक १मधील उमेदवार विजयश्री संतोष पाटील, लीना नंदकुमार म्हात्रे, नितेश बाळकृष्ण पाटील आणि संतोष बाबुराव भोईर यांच्या प्रचाराचा शुभारंभ भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शनिवारी (दि. ३) धानसर येथे श्रीफळ वाढवून करण्यात आला. त्या वेळी ते बोलत होते.

यानिमित्ताने आयोजित प्रचार रॅलीला मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या रॅलीत कार्यकर्त्यांचा ताफा सहभागी झाला होता. ठिकठिकाणी महिलांनी उमेदवारांचे औक्षण करून विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

भाजप नेते अरुणशेठ भगत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, पनवेल महापालिकेच्या निवडणुकीत भाजप महायुतीचे सहा उमेदवार आधीच बिनविरोध निवडून आले आहेत. ही तर फक्त सुरुवात आहे, पिक्चर अभी बाकी आहे. पुढे त्यांनी आपला विजय निश्चित असला तरी गाफील न राहता पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने कामाला लागा आणि प्रत्येक मतदारापर्यंत पोहचून प्रचार करा, असे सूचित केले.

भाजपचे तालुका उपाध्यक्ष सुरेश पोरजी, प्रभाग १ सरचिटणीस जितेंद्र पोरजी, राजेश तांबोळी, काळुराम गोंधळी, विष्णू पोरजी, अभिमन्यू पोरजी, राजेश पोरजी, अक्रम शेख, ज्ञानेश्वर पोरजी, रवी पोरजी, अमीर पोरजी, विश्वनाथ पोरजी, सुरज गोंधळी, अमित पोरजी, रामू पोरजी, सलमान शेख, अरमान शेख, संजय गोंधळी, विजय गोंधळी, बाबुराव पोरजी, अनंता पोरजी, बंडू गोंधळी, रूपेश गोंधळी, अर्जुन गोंधळी, चंदा पोरजी, नंदा पोरजी, कीर्ती पोरजी, अश्विनी पोरजी, शारदा पोरजी, गौरी पोरजी, निकिता पोरजी, पद्मा पोरजी, राशिदा सुलतान शेख, जीवन पोरजी, पूनम गोंधळी, जागृती गोंधळी, कल्पेश गोंधळी, मोनिका पोरजी, स्वाती पोरजी, केतन गोंधळी, अक्षय पाटील, किरण पाटील, बारक्या पाटील, प्रियांका पोरजी, दिव्या पाटील, मनिषा पाटील, जोत्स्ना भोईर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाचा भाजप महायुतीच्या उमेदवारांना पाठिंबा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकनने पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजप महायुतीच्या उमेदवारांना आपला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला आहे. या पाठिंब्याचे पत्र माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना स्वाभिमानी युथ रिपब्लिकनचे रायगड जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी शनिवारी (दि. ३) दिले.

स्वाभिमानी रिपब्लिकन पक्षाच्या जिल्हा कार्यकारिणीने घेतलेल्या निर्णयानुसार पनवेल महानगरपालिका निवडणूक २०२५-२६करिता भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरपीआय (आठवले गट) महायुतीच्या सर्व उमेदवारांना आपला जाहीर पाठिंबा असल्याचे पत्र जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी दिले आहे. या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांच्या विजयासाठी आमच्या पक्षाचे कार्यकर्ते सक्रियपणे काम करतील, असा विश्वासही त्यांनी दिला आहे.

पाठिंबापत्र देतेवेळी जिल्हाध्यक्ष साळुंखे यांच्यासमवेत पनवेल विधानसभा अध्यक्ष निलेश कांबळे, शहराध्यक्ष प्रशांत सोनावणे, भारत दातार, मनोज कांबळे, अशीफ शेख, समाधान कांबळे, अमित वाघमारे आदी उपस्थित होते.

## महासंचालक दातेंनी पदभार स्वीकारला



**मुंबई : प्रतिनिधी**

माजी एनआयए प्रमुख सदानंद दाते यांनी शनिवारी (दि. ३) राज्याच्या पोलीस महासंचालक अर्थात डीजीपी या पदाची सूत्रे स्वीकारली. पदभार स्वीकारल्यानंतर दाते यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली.

भारतीय पोलीस सेवेतील (आयपीएस) १९९०च्या बॅचचे अधिकारी असलेले सदानंद दातेंची राज्याच्या पोलीस महासंचालकपदी दोन वर्षांसाठी नियुक्ती झाली आहे. त्यांनी मावळत्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्याकडून सूत्रे स्वीकारली. ते राष्ट्रीय तपास संस्थेचे (एनआयए) नेतृत्व करण्यासाठी नवी दिल्लीला होते. राज्य सरकारच्या विनंतीवरून त्यांना दोन आठवड्यांपूर्वी महाराष्ट्रात परत पाठवण्यात आले.

### निवडक

#### छत्तीसगडमध्ये चकमकीत १४ माओवाद्यांना कंठस्नान

**रायपूर :** छत्तीसगडमध्ये शनिवारी (दि.३) दोन वेगवेगळ्या ठिकाणी सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत एकूण १४ माओवादी मारले गेले. यापैकी बस्तर भागात बिजापूर जिल्ह्यात दोन आणि सुकमा जिल्ह्यात १२ माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला. सुरक्षा दलांनी घटनास्थळावरून रायफलींसह इतर शस्त्रेही जप्त केली आहेत. या चकमकीत ठार झालेल्या माओवाद्यांमध्ये आठ लाख रुपयांचं बक्षीस असलेला नक्षलवादी कमांडर मंगडू याचाही समावेश आहे.

#### बांगलादेशात जिवंत जाळलेल्या हिंदू व्यक्तीचा अखेर मृत्यू

**ढाका :** बांगलादेशमध्ये तीन दिवसांपूर्वी हल्ला करून जिवंत जाळण्यात आलेले हिंदू व्यापारी खोकन दास (वय ५०) यांचे अखेर शनिवारी (दि. ३) ढाका येथील नॅशनल बर्न इन्स्टिट्युटमध्ये उपचारादरम्यान निधन झाले. दुकान बंद करून घरी परतणाऱ्या दास यांना हल्लेखोरांनी रस्त्यात अडवत शस्त्रांनी वार करून अंगावर पेट्रोल टाकून पेटवून दिले होते. तीन दिवस त्यांनी मृत्यूशी झुंज दिली. अखेर त्यांचा मृत्यू झाला.

## कर्जतमध्ये पिसाळलेल्या कुत्र्याचा हल्ला; अनेकजण जखमी





**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील उमरोली, आषाणे परिसरात भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट वाढत असून एका पिसाळलेल्या कुत्र्याने परिसरातील नागरिकांवर हल्ला केल्याची गंभीर घटना शनिवारी (दि. ३) घडली. या हल्ल्यात आतापर्यंत तीन जखमींची नावे समोर आली असली तरी प्रत्यक्षात आणखी पाच ते सहा नागरिक या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याची माहिती स्थानिकांकडून मिळत आहे.

पिसाळलेल्या कुत्र्याने समृद्धी कॉम्प्लेक्समधील १२ वर्षीय मुलाच्या गालाचे चावा घेतल्याने तो गंभीर जखमी झाला असून त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, तर प्रसाद लोंगले आणि नागो घारे या व्यक्तीच्या कुत्र्याने पायाला, हाताला चावा घेऊन लचके तोडल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. या दोघांनाही स्थानिक रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

भटक्या कुत्र्याच्या अचानक हल्ल्यांमुळे नागरिकांमध्ये विशेषतः लहान मुले, वृद्ध व महिलावर्गात भीती निर्माण झाली आहे. स्थानिक प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## भगवान गौतम बुद्धांचे ज्ञान कालातीत -पीएम मोदी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भगवान गौतम बुद्धांचे ज्ञान, त्यांनी दाखवलेला मार्ग हा संपूर्ण मानवतेचा आणि कालातीत आहे. भगवान बुद्ध सर्वांचे आहेत आणि ते सर्वांना जोडून ठेवतात, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि.३) केले.

नवी दिल्लीतील राय पिथोरा सांस्कृतिक संकुलात, भगवान बुद्धांशी संबंधित, पवित्र पिप्रावा अवशेषांच्या, भव्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाचे उद्घाटन केल्यानंतर पंतप्रधान मोदी बोलत होते. सव्वाशे वर्षांच्या प्रतीक्षेनंतर हे अवशेष भारतात परत आल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमास केंद्रीय मंत्री गजेंद्र सिंह शेखावत, किरेन रिजिजू, रामदास आठवले, दिल्लीचे नायब राज्यपाल विनयकुमार सक्सेना, दिल्ली सरकारमधले मंत्री, बौद्ध धर्माचे प्रतिनिधी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

पंतप्रधान मोदी म्हणाले, हे अवशेष भारताबाहेर नेणाऱ्यांसाठी त्या फक्त निर्जीव वस्तू होत्या, म्हणून या वस्तूंचा लिलाव करायचा प्रयत्न त्यांनी केला, पण भारताने तसे होऊ न देता भगवान बुद्धांच्या कर्मभूमीत हे अवशेष परत आणले. भगवान बुद्धांशी संबंधित विविध ठिकाणी असलेले त्यांचे अवशेष म्हणजे त्यांच्या संदेशाचे जिवंत प्रतीक आहे. भारताने हे अवशेष विज्ञान आणि अध्यात्म या दोन्ही दृष्टींनी सांभाळून ठेवले आहेत तसेच जगभरात अशा प्रकारच्या ठिकाणांच्या विकासासाठी शक्य होईल ते योगदान देण्याचा भारताचा प्रयत्न आहे.

**पनवेल : भाजपच्या खारघर शहर उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर खरपुरिया यांची नियुक्ती झाली आहे. याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी खरपुरिया यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी व इतर मान्यवर उपस्थित होते.**




## पनवेल महापालिकेकडून मतदान जनजागृती




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

निवडणुकीच्या अनुषंगाने नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने पनवेल महापालिकेच्या वतीने मतदान जनजागृती कार्यक्रम (स्वीप) सुरू आहे. त्या अंतर्गत शनिवारी (दि. ३) कळंबोलीतील केएलई कॉलेजमध्ये भव्य वॉकथॉनचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात सुमारे २०० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.

वॉकथॉनची सुरुवात केएलई कॉलेज (शिवशंकर मंदिर परिसर) येथून झाली. पुढे कळंबोली सिटी हॉस्पिटल, शिव मंदिर रोड, अमर हॉस्पिटल, राजकमल को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीमार्गे गुरू नानक देवजी चौक, होली स्पिरिट चर्च, गुरू रविदास चौक, डॉ. राम बाबू अदेवी हॉस्पिटल, एमएसईबी कार्यालय, भारत पेट्रोलियम सीएनजी पंप, सेंट सेबॅस्टियन चर्च, सेंट जोसेफ स्कूल रोड, एचपीसीएल रोड व हनुमान मंदिर रोड असा मार्ग पार करून पुन्हा केएलई कॉलेज येथे वॉकथॉनचा समारोप करण्यात आला.

लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येकाने मतदानाचा हक्क बजावावा, असा संदेश या वेळी देण्यात आला. त्याचबरोबर निश्चितपणे मतदान करू, अशी शपथ सहभागींकडून घेण्यात आली.

या उपक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून केएलई महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय मेंडुळकर, महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी नितीन साके आणि एनएसएस कार्यक्रम अधिकारी शीतल घार्गे उपस्थित होते. त्यांनीही उपस्थितांना मतदानाचे महत्त्व पटवून देत जास्तीत जास्त मतदान करण्याचे आवाहन केले.

या उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी पारंपरिक पद्धतीने पोवाड्याच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व पटवून देऊन मतदान करण्याचे आवाहन केले तसेच या वेळी मतदानविषयक परिसंवादाचे आयोजन करण्यात आले. या परिसंवादात विद्यार्थ्यांनी नागरिकांच्या सामाजिक व सार्वजनिक हितासाठी मतदानाचे महत्त्वाचे असल्याचे सांगितले.

## रायगडात वर्षभरामध्ये ३,२९४ गुन्ह्यांची उकल



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यक्षेत्रात गेल्या वर्षभरात ३३२७ गुन्ह्यांची नोंद झाली. त्यातील ३२९४ गुन्ह्यांची उकल करण्यात यश आले. त्यामुळे दाखल गुन्हे उघडकीस येण्याचे प्रमाण ९९ टक्के झाले असून शाबितीकरणाचे प्रमाणही वाढले असल्याची माहिती पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी शनिवारी (दि.३) पत्रकार परिषदेत दिली.

वर्षभरात खुनाचे ३२ गुन्हे दाखल झाले, त्यापैकी ३१ गुन्हे उघडकीस आणले. पेण येथील सुटकेसमध्ये सापडलेल्या महिलेच्या खुनाची अद्याप उकल होऊ शकलेली नाही. खुनाचा प्रयत्न करण्याचे २७ गुन्हे दाखल झाले होते, ते सर्व उघडकीस आले. दरोड्याचे तीन गुन्हे उघडकीस आले. जबरी चोरीचे २८ गुन्हे दाखल झाले होते, त्यापैकी २४ उघड झाले. चोरी व घरफोडीच्या गुन्ह्यांपैकी ६६ टक्के गुन्ह्यांची उकल झाली आहे.

भारतीय न्याय संहितेमधील कलमांनुसार वर्षभरात २२८२ गुन्हे दाखल झाले होते, त्यापैकी २०६४ गुन्हे उघडकीस आणण्यात आले. अवैध धंदे प्रकरणात जुगाराचे ११५ गुन्हे दाखल झाले, ते सर्व उघड झाले. दारूबंदीचे ६२५ गुन्हे दाखल झाले, त्यापैकी ६२४ उघड झाले आहेत.

> *गुन्ह्यांची उकल करण्यावर आम्ही भर देत आहोत. त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. त्याचबरोबर गुन्हेगारी प्रवृत्तींना आळा बसावा यासाठी प्रतिबंधात्मक कारवाईवरही भर दिला जात आहे. येत्या वर्षात गुन्हे शाबितीकरणाचे प्रमाण वाढावे यासाठी व्यापक प्रयत्न केले जातील.*
>
> ***-आंचल दलाल,*** *पोलीस अधीक्षक, रायगड*

वर्षभरात बलात्कार आणि विनयभंगाची प्रत्येकी १३६ प्रकरणे समोर आली. यंदा महिलांवरील अत्याचारांचे गुन्हे वाढले असले तरी बलात्काराच्या आणि विनयभंगाच्या १०० टक्के गुन्ह्यांची उकल करण्यात आली.

२०२४मध्ये प्रथम वर्ग न्यायालयांत गुन्हे शाबितीकरणाचे प्रमाण ५६ टक्के होते, ते २०२५मध्ये ६० टक्क्यांवर आले आहे. सत्र न्यायालयात गुन्हे शाबितीकरणाचे प्रमाण जेमतेम २० टक्क्यांवर आहे.

पोलीस मुख्यालयाच्या जंजिरा सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेस अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, अलिबागच्या पोलीस उपअधीक्षक माया मोरे आदी उपस्थित होते.

# कस्टमर केअरच्या नावाखाली गंडा

**पनवेल : वार्ताहर**

घरातील फ्रीज दुरुस्त करण्यासाठी गुगलवर कंपनीचा कस्टमर केअर नंबर शोधणे एका ५९ वर्षीय महिलेला चांगलेच महागात पडले आहे. या महिलेने गुगलद्वारे मिळालेल्या ज्या कस्टमर केअरच्या नंबरवर संपर्क साधला, त्या बनावट कस्टमर केअर प्रतिनिधीने पाठवलेल्या लिंकवर क्लिक केल्यामुळे या महिलेचा मोबाईल फोन हॅक होऊन तिच्या तीन बँक खात्यांतून तब्बल ११ लाख पाच हजार रुपये परस्पर लंपास करण्यात आल्याची धक्कादायक घटना नवीन पनवेल परिसरात उघडकीस आली आहे.

खांदेश्वर पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात सायबर चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. सुधा नायर (वय ५९) असे या महिलेचे नाव असून त्या नवीन पनवेल येथे वास्तव्यास आहेत. गत २० डिसेंबर रोजी रात्री नायर यांच्या घरातील फ्रीज नादुरुस्त झाला. त्यामुळे त्यांनी फ्रीज दुरुस्तीसाठी गुगलवर हायर कंपनीचा कस्टमर केअर टोल फ्री नंबरचा शोध घेतला. या नंबरवर बोलणाऱ्या व्यक्तीने स्वतःचे नाव राम शंकर पाटील असल्याचे तसेच तो नोएडा येथील कस्टमर केअर सेंटरमधून बोलत असल्याचे सांगितले.

तक्रार नोंदवण्यासाठी त्याने व्हॉट्सॲपवरून कस्टमर केअर सपोर्ट नावाची एपीके फाईल पाठवून ती ओपन करून त्यात माहिती भरण्यास सांगितले. तसेच कंपनीच्या नवीन धोरणानुसार १० रुपये गुगल पे करण्यास सांगितले. सुधा नायर यांनी १० रुपये पेमेंट करण्याचा प्रयत्न करताच त्यांच्या मोबाईलची स्क्रीन अचानक ब्लॅक झाली. बॅटरी संपली असावी असे समजून त्यांनी मोबाईल चार्जिंगला लावला, मात्र मध्यरात्री बँकेकडून आलेल्या संदेशांमुळे त्यांना धक्का बसला. त्यांच्या बँक खात्यातून तीन लाख ६९ हजार रुपये डेबिट झाल्याचे, तसेच आणखी संशयास्पद ट्रान्झॅक्शन झाल्याचे त्यांना निदर्शनास आले.

त्यांच्या दुसऱ्या बँक खात्यातून २५ हजार रुपये, तिसऱ्या बँक खात्यातून ६ लाख २३ हजार रुपये काढण्यात आल्याचे समोर आले. त्यावर सुधा नायर यांना आपला मोबाईल हॅक झाल्याची खात्री पटताच त्यांनी त्वरित सायबर हेल्पलाइन १९३० वर व नंतर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली.

# सरपंच सोमनाथ ओझर्डेंसह दोघांवर ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील शिरगाव गावचे सरपंच तसेच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपजिल्हा समन्वयक सोमनाथ ओझर्डे यांच्यासह अन्य दोघांवर जातीवाचक शिवीगाळ व दमदाटी केल्याप्रकरणी शुक्रवार, २ जानेवारी २०२६ रोजी महाड शहर पोलीस ठाण्यात ट्रॉसिटी कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाड शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार रोहन किसन ढेंडवाल यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १ जानेवारी २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास फिर्यादी व त्यांचे काही मित्र महाड शहरांच्या एका ठिकाणी गप्पा मारत उभे असताना सोमनाथ ओझर्डे तेथे आले. त्यांनी फिर्यादीकडे उद्देशून, बघितलेस ना कशी जिरवली तुझ्या विकास गोगावलेची, होतो का जामीन आता बघ! असे वक्तव्य केले.

या वक्तव्यावर फिर्यादीने शब्द जपून वापरण्याची विनंती केली असता, फिर्यादी अनुसूचित जातीचा असल्याच्या कारणावरून ओझर्डेंसह अन्य दोघांनी जातीवाचक शिवीगाळ करून दमदाटी केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

या प्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात सोमनाथ दिगंबर ओझर्डे (रा. शिरगाव, महाड), अक्षय भोसले (रा. नवेनगर, महाड) व प्रतीक जगताप (रा. ताम्हाणे, महाड) यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १८९(२), ३५१(२), ३५२ तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास महाड शहर पोलीस ठाणे करीत आहेत.

# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर टेम्पोचा भीषण अपघात; चालकाचा मृत्यू

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुबंई पुणे एक्सप्रेसवेवेवर आज सकाळी एका आयसर टेम्पोने धुक्यात समोरील वाहनाला जोरदार धडक दिल्याने भीषण अपघात झाला असून या अपघातात टेम्पो चालकाचा जागीच मृत्यू झाला आहे



मुबंई पुणे एक्सप्रेस वेवरून आयसर टेम्पो (डीडी ०१ आर ९९५३) मुंबई हुन पुण्याकडे माल घेऊन जात असताना महामार्गांवर पहाटे मोठ्या प्रमाणात धुके असल्याने टेम्पो चालकाला समोरील वाहनांचा अंदाज न आल्याने त्याने समोरील अज्ञात वाहनाला पाठीमागून जोरदार धडक दिली यात टेम्पोच्या केबिन मध्ये चालक अडकून तो गंभीर जखमी होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला आहे.

या अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, डेल्टा फोर्स व देवदूत यंत्रणा, अपघात ग्रस्त टीमचे सदस्य तत्काळ घटनास्थळी दाखल होत टेम्पो मध्ये अडकेलेल्या चालकाला बाहेर काढून अपघात ग्रस्त टेम्पो बाजूला घेऊन महामार्ग वाहतूकसाठी चालू करण्यात आला आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात शनिवारी (दि.३) महान समाजसुधारक, शिक्षणक्रांतीच्या जननी सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रम कर्मचारी कल्याण समिती आणि ग्रंथालय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमात सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याचा आढावा घेण्यात येणार असून शिक्षण, स्त्री-शिक्षण आणि सामाजिक समतेसाठी त्यांनी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकण्यात आला. यावेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे मॅडम यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शाखेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. पूजा लांजेकर (समन्वय, ग्रंथालय समिती) तसेच प्रा. रिझवान मोमीन (समन्वयक, कर्मचारी कल्याण समिती व ग्रंथपाल, समाधान बेहेरे यांनी केले तसेच महाविद्यालयातील इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी उपस्थित राहुन सहकार्य केले.

# पेणमध्ये नूतन वनपरिक्षेत्र कार्यालयाचे उदघाट्न

**पेण : प्रतिनिधी**

वनविभाग अलिबाग अंतगर्त वनपरिक्षेत्र कार्यालय पेणच्या नूतन वास्तूचा उदघाट्न सोहळा खासदार धैर्यशिल पाटील यांच्या हस्ते व आमदार रविशेठ पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.





या कार्यक्रमास खासदार धैर्यशिल पाटील, आमदार रविशेठ पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकुल, भाजप रायगड महामंत्री वैकुंठ पाटील, नायब तहसिलदार प्रसाद कालेकर, बाजारसमिती सभापती महादेव मानकर, उपवनसंरक्षक अधिकारी अलिबाग राहुल पाटील, पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ, सहाय्यक वनसंरक्षक अधिकारी भाऊसाहेब जवरे, वनक्षेत्रपाल अलिबाग कुलदीप पाटकर, पेण वनपरिक्षेत्र अधिकारी सपना सोनार, माजी जि.प. सदस्य प्रभाकर म्हात्रे, नगरसेवक निळकंठ म्हात्रे, कृषी अधिकारी सागर वाडकर, उद्योजक राजू पिचिका, पशुवैद्यकीय अधिकारी प्रमोद गायकवाड, माजी प.स. सदस्य प्रदीप म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले की, उपवनसंरक्षक अधिकारी राहुल पाटील यांनी वनक्षेत्रात येणारी रस्ते, पाणवठे आदी जनहिताच्या कामांना सहकार्य करून मोलाची भूमिका निभावली आहे. खऱ्या अर्थाने वनांचे संरक्षण करण्याचे काम वनअधिकारी करीत असून या वास्तूमधून अशीच कामे होत राहावी असे त्यांनी सांगितले.

खासदार धैर्यशिल पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, वन्यजीव संरक्षण कायद्यात बदल होणे गरजेचे असून बिबट्यांचा मानवी वस्तीत होणारा शिरकाव यामुळे सामान्य शेतकरी, मेंढपाळ व अन्य नागरिकांवर होणारे हल्ले यामध्ये सामान्यांची होणारी प्राणहानी टाळण्यासाठी लोकप्रतिनिधी या नात्याने मी पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी वनअधिकारी यांच्या निवासस्थानी इतर सोयीसुविधांसाठी लागणारा निधी आणण्याचे काम आम्ही निश्चित करू, असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

या वेळी उपवनसंरक्षक अधिकारी राहुल पाटील यांनी प्रास्ताविकात या नूतन इमारतीसाठी ३८ लाखांचा निधी उपलब्ध झाला असून त्याचा पुरेपूर विनियोग करण्यात आला आहे. तसेच जिल्ह्यात वनअधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी २२ निवासस्थाने बांधण्यात येत असून या निवास्थान शेजारी लागणाऱ्या इतरव सोयी सुविधांसाठी आमदार, खासदार यांनी विकास निधीची पूर्तता करावी, अशी मागणी उपस्थित मान्यवरांकडे केली.

या वास्तूचा भूमिपूजन सोहळा गतवर्षी वन अधिकारी कुलदीप पाटकर यांनी केले होते व आज एक वर्षांचा कालावधीत हि इमारत उभी राहिली असल्याचे त्यांनी सांगितले.

# सीकेटी महाविद्यालयात राजमाता जिजाऊ आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या आर्ट्स,कॉमर्स ॲण्ड सायन्स (अधिकारप्रदत्त स्वायत्त) महाविद्यालयात महिला विकास कक्षाच्या वतीने शनिवारी (दि.३) राजमाता जिजाऊ साहेब भोसले यांची तिथीनुसार ४२७ वी आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.



या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. एस. के. पाटील, विज्ञान शाखेच्या प्रमुख प्रो.डॉ.जे. एस. ठाकूर आणि महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा डॉ. आर. डी. म्हात्रे व इतर प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

या वेळी महिला विकास कक्षाच्या अध्यक्षा डॉ. आर. डी. म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून राजमाता जिजाऊ साहेब भोसले यांनी हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी दिलेल्या योगदानाची आणि क्रांतीज्योति सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी दिलेल्या योगदानाची माहिती दिली. प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच उपस्थित प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही अभिवादन केले. हा कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता प्रा. बी. ए. भोईर आणि महिला विकास कक्षाच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

या अतिथी सत्राचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. (डॉ.) एस. के. पाटील, आय.क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने अतिथी सत्राच्या यशस्वी आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या.

# सुभाष राठोड यांची निवड

**मोहोपाडा, चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद शाळा वडगाव चे शिक्षक सुभाष राठोड यांची राज्यस्तरीय आत्मचरित्र लेखन स्पर्धेसाठी निवड झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



शालेय शिक्षण विभागाच्या शिक्षक व अधिकारी स्पर्धेत चमकदार कामगिरी केल्याने त्यांची निवड झाली. रायगड जिल्हा परिषद ग्रामीण उत्कृष्ट उच्च प्राथमिक शाळा वडगाव चे शिक्षक सुभाष रामचंद्र राठोड यांची सध्या सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभागा तर्फे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे आयोजित विविध स्पर्धा सुरू आहेत. त्यातील आत्मचरित्र लेखन स्पर्धेत वडगाव शाळेचे उपक्रमशील व अभ्यासू शिक्षक सुभाष राठोड यांची केंद्र,तालुका व विभागात उत्कृष्ट लेखन, वास्तव घटना व स्वतःच्या आयुष्यातील प्रत्येक प्रसंगाचे वर्णन करत मुद्द्यांच्या आधारे लिहिलेले आत्मचरित्र मुंबई विभागातून राज्य स्तरासाठी निवडले गेले आहे.

ही स्पर्धा रायगड, ठाणे, मुंबई, नवी मुंबई,पालघर या जिल्ह्यातून मुंबई विभाग स्तरांवर घेण्यात आली होती. त्यामुळे त्यांचे जिल्हाभर कौतुक होत असुन शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# निष्पाप नाटकाला दोन पुरस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

६४व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्यस्पर्धेत मुंबई मराठी पत्रकार संघाने पहिल्यांदाच सादर केलेल्या निष्पाप या नाटकाने पदार्पणातच उल्लेखनीय यश मिळवत दोन मानाचे पुरस्कार पटकावले आहेत. पत्रकारांच्या रंभगूमीवरील या पहिल्याच प्रयत्नाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या स्पर्धेत निष्पाप नाटकाला नेपथ्यासाठी प्रदीप पाटील यांना तृतीय, तर प्रकाश योजनेसाठी संजय तोडणकर यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक जाहीर झाले आहे. गिरगावच्या साहित्य संघ मंदिर येथे आयोजित फेरीत एकूण २२ नाट्यप्रयोग सादर झाले.

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या निष्पाप या नाटकाने प्राथमिक फेरीत सशक्त आशय, प्रभावी अभिनय आणि संवेदनशील मांडणीच्या जोरावर परीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. पत्रकार संघासारख्या संस्थेने रंगभूमीवर उतरवलेले हे नाटक सामाजिक जाणिवांना स्पर्श करणारे ठरले.

या यशाबद्दल मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी नाट्यकलाकार आणि तांत्रिक चमू यांचे अभिनंदन केले आहे. पत्रकारांच्या कलागुणांना रंगभूमीवर मिळालेली ही दाद भविष्यातील नाट्यप्रवासाला नवी ऊर्जा देणारी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# पनवेलमध्ये मतदान जनजागृतीसाठी पथनाट्य

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वीप कार्यक्रमाद्वारे मोठ्या प्रमाणावर मतदान जनजागृती केली जात आहे. याचाच एक भाग म्हणून पथनाट्यांचे आयोजन मोठ्या प्रमाणावर केले जात असून गेल्या सात दिवसांपासून पनवेल, कळंबोली, कामोठे व खारघर प्रभागात विविध ६० ठिकाणी पथनाट्याच्या माध्यमातून मतदान जनजागृती करण्यात आली.



पनवेल महापालिकेच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी निवडणूक अधिकारी मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत महापालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी पथनाट्यांचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांमध्ये मतदानाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत असून खारघर, कळंबोली, कामोठे व पनवेल या चारही प्रभागांमध्ये विविध ठिकाणी पथनाट्य सादर केले जात आहेत.

खारघर येथे शिल्प चौक, डेली बाजार चौक, हिरानंदानी, लिटल वर्ल्ड मॉल अशा विविध आठ या ठिकाणी पथनाट्यांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच कळंबोली येथे रोडपाली डी-मार्ट चौक परिसर, कार्मेल स्कूल समोर, आयडीबीआय बँक समोरील चौक, सेंट जोसेफ स्कूल समोर, कळंबोली फायर स्टेशन समोर, कळंबोली भाजी मार्केट, खांदा कॉलनी मुख्य चौक व खांदा कॉलनी गुरुद्वार परिसर या ठिकाणी पथनाट्य सादर करण्यात आली. कामोठे प्रभागात मनमोहन स्वीटस्, कामोठे गाव, मानसरोवर रेल्वे स्टेशन, विस्ता कॉर्नर, ऐश्वर्या हॉटेल अशा विविध सात ठिकाणी पथनाट्य सादर करण्यात आले.

पनवेल शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक, जुने भाजी मार्केट, वडाळे तलाव तसेच नवीन पनवेलमध्ये शबरी हॉटेल, गणेश मार्केट, सीकेटी महाविद्यालय अशा ठिकाणी पथनाट्य सादर करण्यात आले.

# ॲड. प्रथमेश सोमण यांची नियुक्ती

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने संघटनात्म पातळीवर महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील युती संदर्भातील सर्व निर्णय, निवडणुकीचे नियोजन, विविध पक्षांमधील समन्वय तसेच संपूर्ण निवडणूक कार्यभाराची जबाबदारी म्हणजेच निवडणूक प्रमुख म्हणून जबाबदारी पनवेल महापालिकेचे महानगरप्रमुख ॲड. प्रथमेश सोमण यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.



या संदर्भातील अधिकृत पत्र प्रसिद्ध करण्यात आले असून, ते पनवेलचे शिवसेना महानगरप्रमुख प्रथमेश सोमण यांना पाठविण्यात आले आहे. आगामी महापालिका निवडणुकीत पक्षाची भूमिका अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. युतीसंदर्भातील चर्चा, उमेदवार निवड, प्रचाराचे नियोजन, स्थानिक पदाधिकाऱ्यांशी समन्वय साधणे तसेच निवडणुकीदरम्यान येणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या प्रथमेश सोमण यांच्या नेतृत्वाखाली पार पाडल्या जाणार आहेत.

संघटनात्मक अनुभव, कायदेशीर जाण आणि कार्यक्षम नेतृत्वाच्या जोरावर पनवेल महानगरपालिका निवडणुकीत शिवसेनेला यश मिळेल, असा विश्वास पक्ष नेतृत्वाने व्यक्त केला आहे. या नियुक्तीमुळे पनवेल महापालिका निवडणुकीत शिवसेनेच्या तयारीला वेग येणार असून, आगामी राजकीय घडामोडींवर सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

# कामोठे येथून एक जण बेपत्ता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



कामोठे सेक्टर ६ मधील साईनाथ अपार्टमेंटमधून एक ५७ वषीय व्यक्ती बेपत्ता झाल्याची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. बेपत्ता व्यक्तीचे नाव रविकुमार सुदर्शन बल्ला असून त्यांची उंची पाच फूट तीन इंच, नाक सरळ, केस पांढरे व मध्यम, दाढी पांढरी वाढलेली, डोळे काळे, रंग गोरा, बांधा सडपातळ, गालावर खड्डे, गळ्यात चांदीची चेन व रुद्राक्षाची माळ व उजव्या हातात दोन अंगठ्या आहेत. त्यांनी अंगात निळा पांढरा हाफ टि शर्ट व निळी पॅन्ट घातली आहे. त्यांना हिंदी, मराठी, तेलगु व इंग्रजी भाषा येते. अशा वर्णनाची व्यक्ती कोणाला दिसल्यास त्यांनी कामोठे पोलीस ठाणे ८६५५३५४११४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दुखवटा

### कृष्णा निंबरे



**श्रीवर्धन :** कोलमांडले गावाचे ज्येष्ठ नागरिक, शांत व संयमी स्वभावाचे, कुटुंबवत्सल आणि सर्वांशी आपुलकीने वागणारे कृष्णा गोपाळ निंबरे (वय ७३) यांचे बुधवारी (दि.३१) पहाटे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा-सून, तीन मुली, तीन जावई, नातवंडे, भाऊ-बहिणी तसेच मोठा आप्तपरिवार आहे. कै. कृष्णा निंबरे यांचे बारा दिवसांचे विधीकार्य शुक्रवारी (दि.१०) होणार आहे. पित्याचे छत्र हरपल्याने पत्रकार सोपान निंबरे यांच्यासह संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मित्रपरिवार व आप्तेष्टांकडून शोकभावना व्यक्त केली जात आहे.

### चंद्रकांत कांबळी



**उरण :** उरण शहरातील बोरी येथे राहणारे चंद्रकांत नथुराम कांबळी (वय ८५) यांचे गुरुवारी (दि.१) निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे. कै. चंद्रकांत कांबळी यांचे दहावे श्री क्षेत्र माणकेश्वर येथे रविवार (दि.१०)होणार असून उत्तरकार्य (बारावे व तेरावे) मंगळवारी (दि.१२) राहत्या घरी बोरी तालुका उरण येथे होणार आहे.

# भाजप महायुतीच्या प्रचाराचा झंझावात

## प्रभाग ३मधील महायुतीचे उमेदवार निश्चितपणे विजयी होतील -अरुणशेठ भगत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पक्ष महायुतीचे सरकार असल्याने शहराचा सर्वांगीण विकास वेगाने होत आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या समस्या सोडवून त्यांना दर्जेदार सुविधा देण्याचे काम अविरतपणे सुरू आहे.

भाजप नेहमीच विकासाचे राजकारण करत आल्याने आगामी महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग ३ मधील महायुतीचे उमेदवार निश्चितपणे विजयी होतील, असा ठाम विश्वास भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी व्यक्त केला आहे.



पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्रमांक ३ मधील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी आणि आरपीआय महायुतीचे अधिकृत उमेदवार मंजुळा कातकरी, प्रिती ठाकूर, निर्दोष केणी आणि विनोद घरत यांच्या प्रचाराचा अधिकृत शुभारंभ खुटूकबांधन येथे मोठ्या उत्साहात करण्यात आला.



या वेळी अरुणशेठ भगत यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून प्रचाराचा नारळ फोडण्यात आला.

या वेळी कार्यकर्त्यांनी दिलेल्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

प्रचाराच्या या शुभारंभ प्रसंगी भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्यासह जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, वासुदेव घरत, मन्सूर पटेल, माजी नगरसेवक पापा पटेल, साजिद पटेल, जगदीश घरत, सुभाष गायकर, वासुदेव घरत, नावित पटेल, युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष आनंद ढवळे, इस्माईल पटेल, इब्राहिम पटेल, गुरुनाथ ठाकूर, प्रशांत ठाकूर, शुभ पाटील, भगवान घरत, प्रभाकर जोशी, सचिन वासकर, संतोष रेवेनी यांसह महायुतीचे विविध पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



## ◆ प्रभाग क्रमांक २मध्ये भव्य रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत प्रभाग क्रमांक २ मध्ये भारतीय जनता पक्ष आणि महायुतीच्या उमेदवारांनी शक्तीप्रदर्शनासह आपल्या प्रचाराचा भव्य शुभारंभ केला. भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रचार प्रारंभ झाला असून, या वेळी महायुतीच्या विजयाचा ठाम निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

या प्रभागातून महायुतीने काजल पाटील, अरुणा दाभणे, दिनेश खानावकर आणि कृष्णा पाटील या चार उमेदवारांना रिंगणात उतरवले आहे. प्रचाराच्या पहिल्याच दिवशी उमेदवारांनी प्रभागातील प्रमुख भागांतून भव्य रॅली काढली. या रॅलीच्या माध्यमातून मतदारांच्या गाठीभेटी घेण्यावर आणि संवाद साधण्यावर उमेदवारांनी भर दिला.

प्रचारादरम्यान अरुणशेठ भगत म्हणाले की, महापालिकेच्या स्थापनेपासून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही विकासाचा अजेंडा राबवला आहे. याच विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून आम्ही मतदारांसमोर जात आहोत. केलेल्या कामांमुळे जनतेचा महायुतीवर पूर्ण विश्वास असून, प्रभाग २ मधील मतदार भाजपच्या चारीही उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करतील, अशी खात्री त्यांनी या वेळी व्यक्त केली. या प्रचारादरम्यान भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## प्रभाग क्रमांक १६मध्ये उत्साहात प्रचार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका निवडणुकीची रणधुमाळी आता खऱ्या अर्थाने रंगात आली असून, प्रत्येक प्रभागात भाजप-महायुतीच्या उमेदवारांनी प्रचाराचा झंझावात सुरू केला आहे. याच पार्श्वभूमीवर, प्रभाग क्रमांक १६ मधील भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार डॉ. कविता चौतमोल, संतोष शेट्टी, समीर ठाकूर आणि राजेश्री वावेकर यांच्या प्रचार मोहिमेचा जोरदार शुभारंभ करण्यात आला.

प्रचाराच्या या पहिल्या टप्प्यात उमेदवारांनी प्रभागातील मतदारांच्या गाठीभेटी घेत प्रभागाचा कायापालट करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत आणि हा विकासाचा प्रवास असाच अविरत सुरू ठेवण्यासाठी भाजप महायुतीला साथ द्या, असे आवाहन उमेदवारांनी घरोघरी जाऊन मतदारांना केले.

या प्रचारादरम्यान मतदारांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. आपल्या प्रभागातील रस्ते, पाणी, स्वच्छता आणि इतर नागरी सुविधांचे सक्षमीकरण करण्यासाठी भाजप महायुतीच्या चारही उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करावे, आवाहन कार्यकर्त्यांकडून करण्यात आले. या प्रचार शुभारंभामुळे प्रभाग १६ मधील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, महायुतीने निवडणुकीत आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे.



## प्रभाग क्रमांक १९मध्ये प्रचाराचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्रमांक १९ मधील भाजप महायुतीच्या उमेदवारांनी शनिवारी (दि.३) रोहीदास वाडा येथील श्री चेडोबा मंदिरामध्ये दर्शन घेऊन आपल्या निवडणूक प्रचाराचा जोरदार शुभारंभ केला. या वेळी प्रत्येक मतदारापर्यंत पोहचून भाजप महायुतीला विजयी करा, असे आवाहन उमेदवारांकडून करण्यात आले.

प्रभाग क्रमांक १९ मध्ये यापूर्वीच दर्शना भोईर आणि रूचिता लोंढे यांची बिनविरोध निवड झाली असून, प्रचाराच्या प्रारंभी त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. सध्या या प्रभागात राजू सोनी आणि सुमीत झुंझारराव हे दोन उमेदवार निवडणूक रिंगणात असून, भारतीय जनता पक्षाने केलेल्या विकासकामांच्या जोरावर हे दोन्ही उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असे चित्र सध्या प्रभागात दिसत आहे.

या प्रचारावेळी नगरसेविका दर्शना भोईर, रुचीता लोंढे यांच्यासह माजी नगरसेवक अनिल भगत, माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर, संजय भगत, प्रविण मोहोकर, संजय जैन, पवन सोनी, प्रशांत शेड्डे, रेणुका मोहोकर, स्वाती कोळी, बाब्या जाधव, ताणाजी झुगे, उमेश भोसकर, निर्मला वैती, रोहित मोहोकर, आतिष मोहोकर, मधुकर उरणकर, समित मोहोकर, सचीन उरणकर, रजणीश जाधव आदी उपस्थित होते.



## ◆ प्रभाग क्रमांक ८मध्ये संवाद दौरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका प्रभाग क्रमांक ८ मधील भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि आरपीआय महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ कळंबोली शहरातील के.एल. वन आणि के.एल. टू परिसरात भव्य प्रत्यक्ष संवाद दौरा आयोजित करण्यात आला होता.

या दौऱ्यात महायुतीचे उमेदवार बबन मुकादम, रामदास शेवाळे, सायली सरक आणि बायजा बारगजे यांनी घरोघरी भेटी देत मतदारांशी थेट संवाद साधला. गेल्या काही वर्षांत केलेल्या विकास कामे, स्थानिक प्रश्न, पुढील वर्षात करण्यात येणाऱ्या विकासकामांची दिशा आणि महायुतीच्या एकत्रित नेतृत्वामुळे साध्य झालेल्या कामांची माहिती मतदारांपर्यंत पोहोचवण्यात आली.

या प्रचारात कळंबोली शहर प्रमुख तुकाराम सरक, भाजप नेते बबन बारगजे यांच्यासह महायुतीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यकर्त्यांचा जोश, शिस्तबद्ध नियोजन आणि संघटित ताकद यामुळे संपूर्ण परिसरात सकारात्मक वातावरण निर्माण झाले.

दौऱ्यादरम्यान मतदारांनी उमेदवारांचे मनापासून स्वागत केले. विकास, स्थैर्य आणि विश्वास या मुद्द्यांवर महायुतीला मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद ठळकपणे दिसून आला. कळंबोलीतील बहुतांश मतदार महायुतीच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे एकंदरीत चित्र असून, प्रभाग क्रमांक आठमध्ये महायुतीचा प्रचार अधिकाधिक मजबूत होत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

## प्रभाग क्रमांक १३मध्ये शक्तिप्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीचे बिगुल वाजले असून, प्रभाग क्रमांक १३ मधील भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी आणि आर.पी.आय. महायुतीच्या उमेदवारांनी शक्तीप्रदर्शनासह आपल्या प्रचार मोहिमेचा भव्य शुभारंभ केला आहे.

महायुतीचे उमेदवार हेमलता गोवारी, शीला भगत, विकास घरत आणि रवींद्र जोशी हे मतदारांच्या गाठीभेटी घेण्यासाठी सज्ज झाले आहेत. या प्रचार शुभारंभावेळी भाजप महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. प्रचारात कमळ या चिन्हासमोरील बटण दाबून महायुतीच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

नागरिकांचा मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता प्रभाग १३ मध्ये महायुतीने मोठी मुसंडी मारली आहे.





**खारघर : प्रभाग क्रमांक ४मधील भाजप महायुतीचे अधिकृत उमेदवार प्रवीण पाटील, मधू पाटील, अनिता पाटील, परेशा ब्रिजेश पटेल यांच्या प्रचार मोहिमेचा जोरदार शुभारंभ करण्यात आला.**

## प्रभाग क्रमांक ११मध्ये प्रचाराचा जोरदार शुभारंभ

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीचे बिगुल वाजले असून प्रभाग क्रमांक ११ मध्ये महायुतीने आपली पूर्ण ताकद पणाला लावली आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांचे खंदे समर्थक हॅप्पीसिंग, प्रदीप भगत आणि नीलम मयूर मोहिते हे भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि आर.पी.आई. महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून रिंगणात उतरले आहेत. या तिन्ही उमेदवारांच्या प्रचाराचा जोरदार शुभारंभ शनिवारी कामोठे येथे मोठ्या उत्साहात करण्यात आला.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपच्या माध्यमातून झालेल्या चौफेर विकासकामांमुळे मतदारांचा चांगला प्रतिसाद त्यांना मिळत आहे. मगती विकासाची, शक्ती विश्वासाची ही भूमिका घेऊन महायुतीचे उमेदवार मतदारांसमोर जात असून, पहिल्याच दिवशी त्यांना नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळताना दिसत आहे. हॅप्पीसिंग, नीलम मोहिते आणि प्रदीप भगत हे तिन्ही उमेदवार सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर राहिले असून, सर्वसामान्यांच्या अडीअडचणींना धावून जाणारे नेतृत्व म्हणून त्यांची प्रभागात मोठी ओळख आहे. परिसरातील नागरी समस्या, पायाभूत सुविधांचे सक्षमीकरण, स्वच्छता, अखंडित पाणीपुरवठा आणि स्थानिक तरुणांच्या रोजगाराचे प्रश्न सोडवण्यासाठी या तिन्ही उमेदवारांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

महायुतीमधील सर्व घटक पक्षांच्या संघटित ताकदीमुळे आणि कार्यकर्त्यांच्या मोठ्या फौजेमुळे प्रभाग क्रमांक ११ मध्ये यंदा महायुतीचे पारडे जड दिसत आहे. विकासाच्या मुद्द्यावर निवडणूक लढवत असलेले हे तिन्ही उमेदवार विजय संपादन करतील, असा विश्वास यावेळी उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.





### दिनदर्शिका प्रकाशन

**पनवेल : नवीन वर्षाचे स्वागत आणि वाचकसेवेचा वारसा जपत दै. महासागरच्या वतीने सन २०२६ची नूतन दिनदर्शिका प्रसिद्ध करण्यात आली आहे. या दिनदर्शिकेचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रकाशन सोहळ्यास स्वाभिमानी रिपब्लिकन युथ रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे, ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, रत्नाकर पाटील, सुनील पाटील, साहिल रेळेकर, दै. महासागरचे प्रतिनिधी स्वप्नील दुधाने, दत्तात्रय कुलकर्णी आदी उपस्थित होते.**

## लोकनेते 'दिबां'च्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आज रक्तदान शिबिर


**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल-उरण आगरी समाज मंडळाच्या वतीने लोकनेते दिवंगत दि.बा. पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर रविवारी (दि.४) सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत मंडळाच्या पनवेल येथील महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात होणार आहे.

शिबिराला सहकार्य लोकनेते दि.बा. पाटील २७ गाव संघर्ष समिती आणि रुधीरसेतू सेवा संस्था यांचे आहे. सर्व रक्तदात्यांना आकर्षक भेटवस्तू व प्रमाणपत्र मंडळातर्फे देण्यात येईल. रक्तदात्यांनी लोकनेते दि.बा. पाटील यांना आदरांजली वाहून रक्तदान करावे, असे आवाहन पनवेल-उरण आगरी समाज मंडळाचे अध्यक्ष अतुल पाटील, सचिव बी.पी. म्हात्रे, कोषाध्यक्ष विजय गायकर आणि सहकाऱ्यांनी केले आहे.

# २०२६ : मल्टीप्लेक्स फोर डी, व्हीएफएक्स आणि एआयचे







आर्टिफिशियल इंटेलिजन्स (अर्थात एआय) म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ताचा वाढता प्रभाव आज आपण सोशल मीडियापासून नवीन चित्रपटापर्यंत पाहतोय. कोणता फोटो खरा नि कोणता एआय तंत्रज्ञानाच्या माध्यमातील आहे हे ओळखणे एक नवीन काम झाले आहे. बाहुबली ,पुष्पा, कांतारा, बाहुबली २, निमल, धुरंदर या चित्रपटातील व्हीएफएक्स आणि एआय तंत्रज्ञानाच्या वापराला रसिकांची मिळालेली सुपरहिट दाद, विशेष उल्लेखनीय गोष्ट काही मल्टीप्लेक्समध्ये फोर डी या तंत्रज्ञानाचा आपल्याला वेगळाच आनंद मिळतो.

पडद्यावरील दृश्यानुसार आपलीही ऐशआरामी प्रशस्त खुर्ची हलते, फिरते. चित्रपट एन्जॉय करणं आता फक्त आणि फक्त पडद्यावरील गोष्टीपुरते राहिलेले नाही. आता तोच चित्रपट मल्टीप्लेक्समधील वातावरणात जाणवतो. अर्थात, चित्रपटाची मध्यवर्ती कल्पना, त्यावरची बंदिस्त पटकथा, जोरदार संवाद (घायल हू इसलिए घातक हू), अफलातून कला दिग्दर्शन, उच्च दर्जाचे छायाचित्रण, कौशल्यपूर्ण संकलन, व्यक्तीरेखेनुसार वेशभूषा रंगभूषा, फोकस पूर्वप्रसिद्धी हे सगळे महत्त्वाचं आहेच, पण हे सगळे मल्टीप्लेक्सच्या आलिशान संस्कृतीत अनुभवणे हा नवीन युगातील नवीन चित्रपट आहे. आपल्या हिंदी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात डोकावताना बोलपटावर फोकस टाकताना अर्दे शीर इराणी दिग्दर्शित आलम आरा (१९३१) ते रमेश सिप्पी दिग्दर्शित शोले (१९७५) असा एक टप्पा मानला जातो. आणि ते सामाजिक सांस्कृतिक माध्यमदृष्ट्याबरोबरच आहे, कारण 'शोले'नंतरचा हिंदी चित्रपटाचा प्रवास आणि प्रभाव हा अनेक वळणावळणाचा, चढ उताराचा आणि आव्हानात्मक आहे. त्यातही राजश्री प्रॉडक्शन निर्मित व सुरजकुमार बडजात्या दिग्दर्शित हम आपके है कौन (१९९४) आणि यशराज फिल्म्स निर्मित व आदित्य चोप्रा दिग्दर्शित दिलवाले दुल्हनियाँ ले जायेगे (१९९५)पासून हा प्रवास आणखी एक भारी वळण घेणारा ठरला.

नवीन शतकातील पहिल्या दशकात आपल्या देशात मल्टीप्लेक्स कल्चर, मोबाईल या गोष्टी रूजल्या. तसा चित्रपटाचा प्रवासही बदलत बदलत गेला. समाजातील खालच्या माणसापर्यंत पोहचलेल्या चित्रपटांवर फोकस कायम राहतानाच मल्टीप्लेक्स युगात महागड्या तिकीट दराने चित्रपट (आता त्याला मुव्ही म्हणतात) ही नवश्रीमंत व उच्चभ्रू समाजातील आवडनिवड झाली. हा क्लास चित्रपटापेक्षा समोसा पॉपकॉर्न आणि शीतपेये यांचा आस्वाद घेत घेत पडद्यावर पाहतो. आज सोशल मीडियातून चित्रपट आणि चित्रपटसृष्टीवर मोठ्याच प्रमाणावर भाष्य केले जातेय. चित्रपटप्रेमींना त्यामुळे मतस्वातंत्र्य मिळाले आहे, हादेखील एक बदलच.

शोले ते निमल आणि पुढे असा आता याच हिंदी चित्रपटाचा प्रवास सुरू झाला आहे असे नवीन समीकरण आहे.



चित्रपट माध्यम म्हणजे अनेक प्रकारच्या कला आणि तंत्रज्ञान यांची सांगड या व्याख्येने सतत बदलत्या आणि नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करत करत वाटचाल सुरू ठेवली आहे. हा अभ्यासाचा विषय आहे. चित्रपटसृष्टीत किस्से, कथा, दंतकथा, गॉसिप, गोष्टी, योगायोगाच्या गोष्टी यापलिकडे जाऊन हे विश्व आहे. या विस्तारत आणखीन एक अत्याधुनिक पाऊल म्हणजे कृत्रिम बुद्धीमत्ता (अर्थात आर्टिफिशियल इंटेलिजन्स).

चित्रपटाने सोळा एमएमचा पडदा, पस्तीस एम एम ते सिनेमास्कोप तसेच सत्तर एम.एमचा पडदा, त्रि मिती (थ्री डी, अर्थात वेगळा चष्मा लावून) अशी एकीकडे प्रगती करतानाच एकपडदा चित्रपटगृह अर्थात सिंगल स्क्रीन थिएटर्स ते मल्टीप्लेक्स, मोबाईल स्क्रीन ओटीटी असाही प्रवास केला आणि तो त्या त्या काळातील चित्रपट रसिकांनी ते स्वीकारले. आपल्या देशात चित्रपट व क्रिकेट या गोष्टींनी जनसामान्यांचे भावविश्व समृद्ध केले. अनेकांचा तो भावनिक समाधान देणारा विषय आहे. चित्रपट आणि क्रिकेट हे समजायला, पहायला, बोलायला, ऐकायला फार फार सोपा विषय मानला जातो. प्रत्यक्षात मात्र तसं नाही. दोन्हीत बुद्धीमत्ता, मेहनत, डावपेच या गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

चित्रपट , वेबसिरीज या माध्यमातून कृत्रिम बुद्धीमत्तेचेही रूजणे आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढी स्वीकारले आहे, त्याच वेळेस आधुनिक तंत्रज्ञानाच्या आक्रमणापेक्षा आपला रसिक पारंपरिक चौकटीतील चित्रपट, मालिका, वेबसिरीज यात गोष्टीला जास्त प्राधान्य देईल असाही एक विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. नवीन तंत्रज्ञानाच्या प्रभावात कायमच उलटसुलट प्रतिक्रिया व्यक्त होत असतात. चित्रपट माध्यम आणि व्यवसाय आपल्या देशात रूजला तेव्हाही रंगभूमीचे भवितव्य काय असा प्रश्न उपस्थित केला गेला होताच, पण तांत्रिक प्रगती होतच राहणार. माणसाच्या शोध घेण्याच्या वृत्तीचे ते प्रतिक आहे.

चित्रपटातील स्पेशल इफेक्ट्समध्ये कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर होता होता तो मग एखाद्या व्यक्तीरेखेला आजच्या वयाच्या तुलनेत कमी वयाचे दाखवण्यात त्याचा वापर होऊ लागला. आतापर्यंत एखाद्या व्यक्तिरेखेचे तारुण्यात पदार्पण करतानाचे रूपडे दाखवताना अन्य एखाद्या कलाकाराची निवड होई. ते स्वाभाविक होतेच, पण आता कृत्रिम बुद्धीमत्तेने तोच आजच्या वयातील कलाकार त्याच्या मागील वयातीलही दाखवता येऊ लागला आहे.

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

'फॅन' या चित्रपटात शाहरूख खानच्या व्यक्तिमत्वाचा प्रवास दाखवताना कृत्रिम बुद्धीमत्तेचा अतिशय हुशारीने वापर करण्यात आले. चित्रपट तंत्राच्या बाबतीत स्पेशल इफेक्ट्सच्या जोडीला कृत्रिम बुद्धीमत्ता असे मानले जाते अथवा तसा वापर करण्यात येतो. शाहरूख खानचीच भूमिका असलेल्या जवान व पठाण या चित्रपटात त्याचा भरपूर वापर करण्यात आला आणि या चित्रपटांना जगभरातील चित्रपट रसिकांनी स्वीकारले याचाच अर्थ त्यांना रूपेरी पडद्यावरील व्हिज्युअल स्पेशल इफेक्ट्स व कृत्रिम बुद्धीमत्ता यांचा वापर मान्य आहे. बी. उन्नीकृष्णन दिग्दर्शित एका मल्याळम भाषेतील चित्रपटात माम्मूटी आयुष्यातील चार विविध टप्प्यावरील दाखवण्यात येत असून त्यातील त्याचे तीस वर्षांचा असतानाचे रूपडे याच कृत्रिम बुद्धीमत्तेने दाखवण्यात येणार असून याबाबत माम्मूटीनेही परवानगी दिली आहे. सध्या माम्मूटी बहात्तर वर्षांचा आहे.

दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपटातून अतिशय मोठ्याच प्रमाणावर व्हिज्युअल स्पेशल इफेक्ट्स आणि कृत्रिम बुद्धीमत्ता यांचा वापर करण्यात येत आहे. पॅन इंडिया चित्रपट युगात एका भाषेतील चित्रपट अन्य भाषेत डब करून ते अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहचण्याच्या व्यावसायिक कार्यविस्तारात दक्षिणेकडील चित्रपटसृष्टी सध्या आघाडीवर असल्याचे दिसते. अधिकाधिक खर्चाचा चित्रपट, त्याची पडदाभर मांडणी, भरपूर अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि दणक्यात चित्रपट प्रदर्शित करणे यातील त्यांच्या धमाकेदार वाटचालीत अनेक चित्रपटांत आता कृत्रिम बुद्धीमत्ता दिसेल. तेथील डी कल्ट स्टुडिओत यासाठीचे अत्याधुनिक तंत्रज्ञान विकसित करण्यात आले आहे. आणि तमिळ, तेलगू, कन्नड, मल्याळम भाषेतील चित्रपट निर्माता व दिग्दर्शकांनी त्याचे स्वागत केले आहे. कासारगोल्ड या चित्रपटात या कृत्रिम बुद्धीमत्तेचा भरपूर वापर करण्यात आला आहे. कल्की २८९८ एडी हा चित्रपट या तंत्रज्ञानाचे उत्तम सादरीकरण करणारा म्हणून ओळखला जातो.

संगणकावर कलाकाराच्या चेहऱ्यावरचे अनेक तांत्रिक प्रयोग, त्याचा चित्रपटात वापर, अनेक साहसी दृश्यात संगणकावर करामती आणि त्याला मूर्त रूप अशी बरीच कारागिरी या आधुनिक तंत्रज्ञानात रूळलीय. स्टोरी टेलिंग ते चित्रपट प्रसिद्धी यातही याचा वापर होतोय. संगणकाचे विश्व खूपच मोठे आहे आणि कृत्रिम बुध्दिमत्तेत बरेच काही करण्याची संधी आहे. त्यामुळे या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास भरपूर संधी (वा स्कोप) देतील अशा साहसी तसेच अगदी फॅण्टसी गोष्टीही आता मोठ्याच प्रमाणावर चित्रपटात दिसतील. यावर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आहारी चित्रपट नेणार का अथवा त्यात दिग्दर्शकाच्या कल्पकतेला वाव तो किती असे अनेक प्रश्न बाजूला पडत जातील की दिग्दर्शकाला या कृत्रिम बुद्धीमत्तेचा कल्पकतेने उपयोग करावासा वाटेल, तशी कथा पटकथा त्याला हवीशी वाटेल हेदेखील महत्वाचे आहे. ओटीटी युगात तर अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करणे आवश्यक आहेच. अशा कृत्रिम बुद्धीमत्तेचा पुरेपूर वापर करणारा सॅम भट्टाचार्य दिग्दर्शित 'आयरा' (२०२४) या चित्रपटाची बरीच चर्चा झाली. ट्वेन्थी सेन्चुरी फॉक्सचा सायफाय रहस्यरंजक चित्रपट 'मॉर्गन' या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आदर्श चित्रपट म्हणून ओळखला जातो. नवं नवं ते हवं हवं अशी भूमिका ठेवल्यास हे अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे पडद्यावरील रूप एका वेगळ्याच विश्वात रममाण करण्यात यशस्वी ठरते.

अनेक ॲनिमेशन चित्रपट या तंत्रज्ञानाने प्रभावित ठरलेत. मल्टीप्लेक्स युगातील मोठा पडदा आणि स्टीरीओफोनिक साऊंड सिस्टीम याला पूरक अशी ही वाटचाल आहे. एखाद्या विशिष्ट कालखंडावरील चित्रपट, चरित्रपट यांच्यासाठी हे अत्याधुनिक तंत्रज्ञान उपयुक्त ठरतेय. या तंत्रज्ञानाचा वापर व विस्तार कल्पनेपलिकडचा आहे.

मराठीत आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर भाष्य करणारा 'दि एआय धर्मा स्टोरी' या चित्रपटात एका वडिलांची आणि मुलीची ही गोष्ट आहे. एआय टेक्नॉलॉजीचा वापर करून वैयक्तिक सूड उगवण्याचा प्रयत्न करत एका निष्ठावंत बापाच्या मुलीचे अपहरण केले जाते. आपल्या मुलीला पुन्हा जिवंत पाहण्यासाठी धर्म मुक्तीच्या धोकादायक प्रवासाला निघालेल्या या वडिलांची ही गोष्ट आहे. हॉलीवूडमध्येप्रमाणे ॲक्शन सिक्वेन्स या चित्रपटात पहायला मिळतात. मराठी चित्रपट आधुनिक तंत्रज्ञानात मागे नाही.


तांत्रिक प्रगतीचे काही दुष्परिणाम वा दुरूपयोगदेखील पहायला मिळतात. याच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर करून रश्मिता मंदाना, आलिया भट्ट यांचे डिकफेक व्हिडिओ करण्यात झाला. सायबर क्राईमचे हे अतिशय धोकादायक पाऊल. याच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवाजवी गैरवापर रूपेरी पडद्यावर होऊ नये नि भलतेच काही दाखवू नये इतकीच अपेक्षा.

नवीन तंत्रज्ञानाचा सर्वाधिक प्रभाव मनोरंजन क्षेत्रात दिसतोय, म्हणून तर लाईव्ह माध्यम म्हणून रंगभूमीकडे अधिक प्रमाणात वळूयात असं मत काहींनी व्यक्त केले आणि त्यानुसार अनेक मराठी सेलिब्रिटीजनी नाटकाच्या तालमी सुरूदेखील केल्या. खरंतर ज्या मराठी चित्रपटसृष्टीने आपल्याला भरभरून दान दिले त्या मराठी चित्रपटसृष्टीसोबत आपण आव्हानात्मक स्थितीत अथवा अडचणीच्या काळात राहणं आवश्यक आहे असे या सेलिब्रिटीजना का वाटलं नसावं?

नवीन वर्षात मोठा चित्रपट (किमान साडेतीन तास) मोठा स्क्रीन (अर्थात मल्टीप्लेक्समध्ये) आणि याच मसालेदार मनोरंजक चित्रपटात व्हीएफएक्स आणि एआय तंत्रज्ञानाचा भरपूर वापर असणार. एका नवीन युगाची ही सुरुवात आहे...

# मराठी नवसाहित्यिकार प्रभाकर पाध्ये

आधुनिक मराठी साहित्यिक, सौंदर्यमीमांसक, पत्रकार व विचारवंत अशी प्रभाकर आत्माराम पाध्ये यांची ओळख होती. आज त्यांची जयंती...



प्रभाकर पाध्ये यांचा जन्म रत्नगिरी जिल्ह्यातील लांजा येथे ४ जानेवारी १९०९ रोजी झाला. शिक्षण रत्नागिरी, मुंबई आणि पुणे येथे. १९३२ साली ते बीए झाले. त्यानंतर प्रतिभा, चित्रा, धनुर्धारी (संपादक, १९३९-४५), दैनिक नवशक्ती (संपादक, १९४६-५३) या नियतकालिकांत त्यांनी काम केले. 'नवशक्ती'त असताना एक तडफदार व व्यासंगी पत्रकार म्हणून त्यांचा लौकिक झाला. त्यानंतर इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडमया संस्थेचे सचिव (१९५३-५४) व काँग्रेस फॉर कल्चरल फ्रीडमचे आशियाई प्रतिनिधी (१९५५-६७) या नात्यांनी त्यांनी काम केले. १९६७पासून 'सेंटर फॉर इंडियन रायटर्स' या संस्थेचे ते संचालक आहेत. कामाच्या निमित्ताने जगभरचा प्रवास त्यांना घडला.

आजकालचा महाराष्ट्र (१९३५) हे त्यांचे पहिले पुस्तक त्यांनी श्री. रा. टिकेकर यांच्या सहकार्याने लिहिले. त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांत कलेची क्षितिजे (१९४२), मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा (१९७०), पाटणकरांची सौंदर्यमीमांसा (१९७७), आस्वाद (१९७७), वामन मल्हार आणि विचारसौंदर्य (१९७८) यांसारख्या समीक्षात्मक आणि सौंदर्यशास्त्रविषयक ग्रंथांचा समावेश होतो. नवे जग नवी क्षितिजे (१९५३), अगस्तीच्या अंगणात (१९५७), उडता गालिचा (१९५९), तोकोनोमा (१९६१), हिरवी उन्हे (१९६४) ही प्रवासावर्णनेही त्यांनी लिहिली आहेत. व्यक्तिवेध या नावाने त्यांनी लिहिलेली शब्दचित्रे १९७३मध्ये प्रसिद्ध झाली. निळे दिवस (१९७६) हा त्यांचा वेचक कथांचा संग्रह.

कलेची क्षितिजे या त्यांच्या समीक्षात्मक ग्रंथात त्यांनी कलेच्या स्वरूपासंबंधी मूलभूत असे प्रश्न उपस्थित केलेले आहेत. कलासाहित्यासंबंधीचा मार्क्सवादी दृष्टिकोण, कलासाहित्यातून होणारा मतप्रचार, कला हे निवेदन की आविष्कार, कलासाहित्य आणि विज्ञान यांचे संबंध आदी तत्कालीन अनेक ज्वलंत प्रश्नांचा विचार त्यांनी केला. कलाविचारातील काही मौलिक संकल्पनाही त्यांनी त्यांतून मांडल्या. मर्ढेकरांची सौंदर्यमीमांसा या ग्रंथात मर्ढेकरांच्या सौंदर्यविचारांची सुसूत्र आणि समतोल मीमांसा त्यांनी केलेली आहे. मर्ढेकरांच्या सौंदर्यविचाराचे मर्म नेमकेपणाने विशद करून मराठीतील कलाविचाराचा ऐतिहासिक दृष्टीने त्यांनी परामर्श घेतला. पाटणकरांच्या सौंदर्यमीमांसेवर त्यांनी केलेले भाष्यही असेच समतोल व मूलग्राही आहे. पाध्यांचा स्वतः चा सौंदर्यविचार कलेची क्षितिजे या ग्रंथातच बीजरूपाने व्यक्त झालेला दिसतो. मनातील चैतन्यशक्तीच्या मूलस्रोताला जाग आणणे हे कलेचे कार्य आहे हे पाध्यांचे प्रमुख सूत्र होय. कलाक्षेत्रात प्रतिमेचे कार्य प्रतिभेच्या साधनेचे असते कोणतीही कलाकृती या दृष्टीने पाहता एक प्रतिमा असते, असे ते मानतात. मराठी कलाविचार प्रगत करण्यात त्यांचा वाटा मोठा आहे. वामन मल्हार आणि विचारसौंदर्य या आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत पाध्ये यांनी प्रतिभेसंबंधीचा एक नवाच सिद्धांत मांडला आहे. प्रतिभा व कल्पनाशक्ती या दोन गोष्टी बऱ्याचशा स्वतंत्र आहेत, असे ते मानतात.

पाध्ये यांचे रसिक, बहुश्रुत आणि कल्पक व्यक्तिमत्त्व त्यांच्या प्रवासवर्णनांतून प्रभावीपणे प्रकटले आहे. त्यांनी लिहिलेल्या कथा मुख्यतः वातावरणप्रधान व मनोविश्लेषणात्मक आहेत. एक विचारवंत म्हणून त्यांनी राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक विषयांवर महत्त्वाचे लेखन केले आहे. त्यातील ग्रंथनिविष्ट लेखनात समाजवादाचा पुनर्जन्म (१९५२) आणि युगोस्लाव्हिया (इंग्रजी, १९५२) यांचा उल्लेख करावा लागेल. १९५०मध्ये झालेल्या गोमंतक साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. १९५२मध्ये मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले. २२ मार्च १९८४ रोजी त्यांचे निधन झाले.

**-रा.ग. जाधव**
(मराठी विश्वकोष)

# जागतिक ब्रेल दिन



दरवर्षी ४ जानेवारी हा दिवस जगभरात जागतिक ब्रेल दिन म्हणून साजरा केला जातो. अंध बांधवांसाठी हा दिवस खूप खास आहे, कारण या दिवशी अंधांच्या आयुष्यात प्रकाश आणणाऱ्या लुई ब्रेल यांचा जन्म झाला. लुई ब्रेल यांनीच ब्रेल लिपीला जन्म दिला, त्यामुळे आज अंध व्यक्तीही लिहिता-वाचू शकतात आणि पुढे जात आहेत.

युनायटेड नेशन्स जनरल असेंब्लीने ६ नोव्हेंबर २०१८ रोजी एक ठराव मंजूर केला, ज्यामध्ये ब्रेल लिपीचे जनक लुई ब्रेल यांचा जन्मदिन दरवर्षी ४ जानेवारी हा 'जागतिक ब्रेल दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर ४ जानेवारी २०१९ रोजी प्रथमच जागतिक ब्रेल दिन साजरा करण्यात आला.

युनायटेड नेशन्सच्या वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या अहवालानुसार जगातील सुमारे ३९ दशलक्ष लोक अंध आहेत, तर साधारण २५३ दशलक्ष लोक डोळ्यांच्या कोणत्या ना कोणत्या समस्येने त्रस्त आहेत. अशा लोकांसाठी ब्रेल लिपी खूप उपयुक्त आहे.


ब्रेल लिपीचे जनक लुई ब्रेल यांचा जन्म ४ जानेवारी १८०९ रोजी फ्रान्समधील कुपर येथे झाला. लहानपणी एका अपघातामुळे लुई ब्रेल यांची दृष्टी गेली. वास्तविक त्याच्या एका डोळ्यावर चाकूने वार करण्यात आले होते. योग्य वेळी उपचार न मिळाल्याने हळूहळू त्यांचा दुसरा डोळाही पूर्णपणे निकामी झाला. त्यानंतर लुई ब्रेल यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागला, पण त्यांनी कधीही हार न मानता त्यांच्यासारख्या लोकांच्या समस्या समजून घेत वयाच्या अवघ्या १५व्या वर्षी ब्रेल लिपीचा शोध लावला, जे आज अंधांसाठी मोठे वरदान आहे.

ब्रेल लिपी ही दृष्टिहीन लोकांना शिकवण्यासाठी वापरली जाणारी लिपी आहे. या लिपीमध्ये अंध व्यक्ती स्पर्शाने वाचू आणि लिहू शकतात. या लिपीमध्ये अंध व्यक्तींना कागदावर उठलेल्या बिंदूंच्या स्पर्शाने शिकवले जाते. या लिपीचा वापर करून वाचनाशिवाय पुस्तकेही लिहिता येतात. ज्याप्रमाणे टंकलेखन यंत्राद्वारे पुस्तके लिहिली जातात, त्याचप्रमाणे ब्रेल लिपीत लिहिण्यासाठी ब्रेलरायटरचा वापर केला जातो. भारत सरकारने दृष्टिबाधित व्यक्तींना सक्षम बनवण्यासाठी त्यांचे अधिकार, शिक्षण, रोजगार आणि कल्याणासाठी अनेक पावले उचलली आहेत. (साभार : इंटरनेट)

# कवयित्री इंदिरा संत

प्रसिद्ध मराठी भावकवयित्री इंदिरा संत यांची आज जयंती. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव इंदिरा दीक्षित. जन्म इंडी (जि. विजापूर ) या गावी ४ जानेवारी १९१४ रोजी झाला. शिक्षण बेळगाव, कोल्हापूर व पुणे येथे बीएबीटीपर्यंत झाले. मराठी आणि मानसशास्त्र या विषयांच्या अध्यापिका म्हणून तसेच बेळगाव येथील मराठी ट्रेनिंग कॉलेजच्या प्राचार्य म्हणून त्यांनी काम केले.

बालपणापासून त्यांना लेखनाची आवड होती. कुटुंबातूनच घडलेले स्त्रीगीतांचे व ओव्यांचे संस्कार त्यांच्यातील कवयित्री घडताना उपयुक्त ठरले. १९३२ सालापासून त्या जाणीवपूर्वक लेखन करू लागल्या. लघुनिबंधकार ना.मा. संत यांच्याशी त्यांचा फर्ग्युसन महाविद्यालयात शिकत असताना परिचय झाला आणि त्याची परिणती विवाहात झाली. त्यांना प्रकाश व रवींद्र ही दोन अपत्ये झाली. या दाम्पत्याच्या कविता सहवास (१९४१) या नावाने प्रसिद्ध झाल्या. बालकवी, माधव जूलियन्, अनिल आणि अनंत काणेकर यांचा प्रभाव या संग्रहातील कवितांतून जाणवतो. पुढे पतीच्या अकाली निधनानंतर एकलेपणाची तरल, अंतर्मुख भाववृत्ती घेऊन त्यांची कविता वेगळ्या रूपाने बहरली. शेला (१९५१), मेंदी (१९५५), मृगजळ (१९५७), रंगबावरी (१९६४), बाहुल्या (१९७२), मृण्मयी (१९८१), चित्कळा



(१९८९), गर्भरेशमी (१९९०), वंशकुसुम (१९९४), निराकार (२०००) हे त्यांचे काव्यसंग्रह मृद्गंध (१९८६) हे आत्मकथन मालनगाथा हे स्त्रियांच्या ओव्यांचे संपादन (२ खंड, १९९६, व मरणोत्तर प्रकाशन २००२) कदली (१९५५) व चैतू (१९५७) हे कथासंगह इ. त्यांच्या साहित्यकृती होत. जीवनातील स्वास्थ्यापेक्षा संघर्षावर श्रद्धा असणाऱ्या इंदिराबाईंनी लिहिलेली भावकविता, ही मराठी साहित्याला लाभलेली अनमोल देणगी आहे.

स्वानुभवाचा संयत पण रेखीव आविष्कार हे त्यांच्या कवितेचे लक्षणीय वैशिष्टच होय. स्वतःची सुखदुःखे,प्रक्षोभ, कुंठितावस्थाचित्रित करताना लवलवत्या प्रतिमासृष्टीला आकार देण्याचे सामर्थ्य त्यांच्या प्रतिभेत असल्यामुळे, त्यांच्या सर्व संगहांतील कविता भावकाव्याचा निरामय ठसा रसिक मनावर उमटवितात तसेच त्यांतून एका प्रदीर्घ काव्यप्रवासाची भावकहाणीही प्रकटत जाते.

भूतकाळाच्या जाणिवेला सतत वर्तमानकाळात आविष्कृत करणे हे त्यांच्या कवितेचे खास वैशिष्ट्ये म्हणावे लागेल.स्त्रीसुलभ साधेपणा, स्वाभाविकता, प्रांजलपणा आणि एक अखंड संवादलय ही त्यांच्या कवितेची अन्य उल्लेखनीय वैशिष्ट्ये होत. त्यांची स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण प्रतिमासृष्टी आणि शब्दकळा, पचेंद्रियाधिष्ठित अनुभूतीचे आवर्त, रंग-गंध-नादरूपाचे प्रसादपूर्ण स्पंदन त्यांच्या कवितेला गतिशील बनविते तसेच मानवी मनाचे आणि विविध भावभावनांचे सर्व ताणतणाव प्रस्फोटित करू शकते. त्यांची कविता हेच त्यांचे व्यक्तिमत्त्व होय. त्यांच्या कवितेतून प्रकटणारी आत्मानुभूती हेच त्या कवितेचे सामर्थ्य असून आत्मरत भावात्मकता ही तिची मर्यादाही आहे. त्यांच्या कवितेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अस्तित्वाबद्दलचे निगूढ व सातत्यपूर्ण चिंतन. त्यामुळे कधी कधी ती एकसुरी वाटली, तरी कंटाळवाणी होत नाही.

ओवीसदृश अशी रचनापद्धती स्वाभाविक ढंगाने त्या उपयोजितात. त्यांच्या मुक्तकांनाही अंतर्गत बंदिशीचा व ठसकेबाजपणाचा डौल असतो. त्यामुळे वरवर सोपी दिसणारी, त्यांची कविता अनुकरणाला अवघड जाते. इंदिराबाईंना अनेक मानसन्मान लाभले. रसिकांच्या प्रेमाबरोबर राजमान्यता लाभली. शेला, मेंदी व रंगबावरी या काव्यसंगहांना राज्य शासनाचे वाङ्मयीन पुरस्कार लाभले तसेच गर्भरेशमी या काव्यसंगहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला (१९८४). नाशिकच्या कुसुमागज प्रतिष्ठानने त्यांना जनस्थान पुरस्कार देऊन सन्मानित केले (१९९५). महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने त्यांना गौरववृत्ती दिली होती. त्यांची राहणी अगदी साधी होती. अखेरची १४ वर्षे त्यांचे बेळगावमध्ये वास्तव्य होते. वृद्धापकाळाने त्यांचे बेळगाव येथे १३ जुलै २००० रोजी निधन झाले.

**-केशव मेश्राम**
(मराठी विश्वकोष)

# जि.प. निवडणूक ताकदीने लढवणार -खासदार पाटील



## नागोठणे येथे भाजप निर्धार मेळावा

**नागोठणे : बातमीदार**

येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत आपण कार्यकर्त्यांनी भाजप उमेदवाराला निवडून आणण्याचा निर्धार करा यश देण्याची जबाबदारी माझी आहे. पूर्ण ताकदीने निवडणूक लढविण्यास तयार आहोत, असा निर्धार भाजप दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष खासदार खासदार धर्यशिल पाटील यांनी उवस्थित असंख्य कार्यकर्त्यांसमोर केला.

नागोठणेजवळील चिकणी या गावात शुक्रवारी (दि.२) सायंकाळी ६ वाजता भारतीय जनता पार्टीचा नागोठणे जिल्हा परिषद निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी खासदार पाटील मार्गदर्शन करताना बोलत होते.

या वेळी जिल्हा महामंत्री सतिश धारप, जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, मारुती देवरे, सोपान जांबेकर, श्रेया कुंटे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, रोहा ता. अध्यक्ष महेश ठाकूर, ता. सरचिटणीस एकनाथ ठाकूर, आनंद लाड, युवा मोर्चा ता. अध्यक्ष निखिल मढवी,ज्येष्ठ नेते महादेव मोहिते, अनंत वाघ, गणपतशेठ म्हात्रे, महिला मोर्चा ता. अध्यक्ष अपर्णा सुटे, शेखर गोळे, अशोक अहिरे, ज्ञानेश्वर शिर्के, प्रमोद नागोठणेकर, गणेश घाग, शहर उपाध्यक्ष गौतम जैन, संज्योती लाड, फातिमा सय्यद आदिंसह भाजप कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते.

जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी सांगितले की, नागोठणे गावा जवळ रिलायन्स सारखा मोठा प्रकल्प असूनदेखील रस्त्याचा पाण्याचा प्रश्न सोडविता आला नाही. बेरोजगारांना रोजगार मिळत नाही हे दुर्दैव आहे. आम्ही जेएसडब्लूच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार मिळवून देतो. सीएसआर फंडातून विविध विकास कामे करतो परंतु नागोठण्यात विकास कामे का होत नाहीत? येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपच्या उमेदवाराला निवडून दिले तर नागोठणे विभागाचे नंदनवन करू तसेच रिलायन्सच्या वाढीव प्रकल्पा मध्ये एक हजार तरुणांना नोकरी मिळवून देऊ असे आश्वासन वैकुंठ पाटील यांनी दिले.

जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राबविलेल्या विविध योजनांची माहिती देऊन भाजपच्या उमेदवाराला का निवडून दिले पाहिजे याविषयी समजावून सांगितले. तालुका अध्यक्ष महेश ठाकूर यांनी सांगितले की, येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत पक्ष नेतृत्व जो आदेश देईल तो आम्हाला मान्य असेल असे सांगितले. या मेळाव्यात नागोठणे रामनगर, कडसुरे, ऐनघर ग्रामपंचायत हद्दीतील आदिवाड्यातील ग्रामस्थांनी भाजपमध्ये प्रवेश केला. सर्व प्रवेशकर्ते ग्रामस्थांचे खासदार पाटील यांनी स्वागत केले.

# वणी ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश



**नागोठणे : बातमीदार**

शिवसेना रोहा उपतालुका प्रमुख मनोज खांडेकर युवा नेते सुमित काते यांच्या नेतृत्वाखाली नागोठणे विभागातील विविध पक्षातील कार्यकर्ते व विविध गावातील ग्रामस्थ शिवसेनेत प्रवेश करीत असून शिवसेनेमध्ये होत असलेल्या प्रवेश सोहळ्यामुळे विरीधकांनी चांगलीच धास्ती घेतलेली दिसत आहे.

शुक्रवार, २ जानेवारी रोजी सायंकाळी मंत्री भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच मनोज खांडेकर व सुमित काते यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाने नागोठणे विभागातील ग्रुप ग्रामपंचायत वणी अंतर्गत मौजे काळकाईवाडी व चेराठीवाडी येथील अनेक ग्रामस्थांनी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.

सर्व प्रवेशकर्त्यांचे मंत्री भरत गोगावले यांनी स्वागत करून आपल्या अडीअडचणी सोडविण्यासाठी आम्ही कटीबद्ध असल्याची ग्वाही दिली.

## शेलू येथे जिजाऊ माँसाहेब चौकाचे अनावरण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर शेलू येथे राजमाता जिजाऊ माँसाहेब चौक उभारण्यात आला आहे. या चौकाचे नामफलक अनावरण आयुष्यवर्धिनी रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. रूपेश सोनावळे यांचे हा झाले. कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्याच्या दुभाजक असलेल्या ठिकाणी हा नामफलक बसवण्यात आला आहे. राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या चाहत्यांनी हा चौक निर्माण केला असून शिवप्रेमी नागरिकांना प्रेरणादायी ठरावा यासाठी हा चौक उभारण्यात आला आहे.

## अशोक लोखंडे विद्यालयात सावित्रीबाई फुले यांची जयंती

**मुरूड : प्रतिनिधी**

महिलांना शिक्षित करण्यासाठी ज्यांनी समाजाच्या खूप हालअपेष्ठा सहन करून स्त्री शिक्षणाची महत्वाची धुरा उचलून महिलांना शिक्षित करण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या थोर समाजसेवीका सावित्रीबाई फुले यांची जयंती निमित्ताने पीटसई येथील अशोक ल लोखंडे विद्यलयात या जयंती निमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून शालेय विद्यार्थ्यांमध्ये सावित्रीबाई फुले यांचा इतिहास सांगण्यात आला आहे.

या विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण खुळपे यांच्या अध्यक्षतेखाली या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सावित्रीबाई फुले यांच्या जीवनचरित्र्यावर शालेय विद्यार्थ्यांनी भाषणे करून इतिहासाच्या आठवणी जागृत करून जाज्वल्य निर्माण केले. शाळेतील मुलींनी सावित्रीबाई फुले यांच्यावर उत्कृष्ठ गाणी गाऊन सर्वांना मंत्रमुग्ध केले. या शाळेतील शिक्षिका सुप्रिया रेडीज, रेखा रेडीज, नीलम गोळे यांनी विशेष माहिती संकलित करून सर्व विद्यार्थ्यांसमोर सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची ओळख करून दिली.

या वेळी मुख्याध्यापक अरुण खुळपे यांनी सावित्रीबाई फुले यांनी कठीण परस्थतीवर मात करून स्त्री शिक्षणाचे काम कधीही सोडले नाही. महिलांना शिक्षित करण्यासाठी घेतलेला निर्णय त्यांनी कधीही न सोडता त्यामध्ये सातत्य ठेवल्यामुळे इंग्रज सरकारास सुद्धा स्त्री शिक्षण खूप महत्वाचे वाटून त्या काळात सुद्धा संरक्षण मिळाल्याचे सांगितले.

या कार्यक्रमासाठी संदीप इंगावले, सुखदेव सवाईसर्जे, संजय ठमके, भागीनाथ बांगर, सुनील तेलंगे, एकनाथ कोळी, वरिष्ठ लिपिक दीपक भोसले, बबन जगताप, रमण महाडिक, कोंडीराम हिरवे आदी उपस्थित होते.




## हरविले आहे

**मी कौशिक रमेशचंद्र अनम रा. खांदा कॉलनी (पनवेल), सदरहु माझ्या घराचे स्थलांतर करतेवेळी खालील कागदपत्रे हरविली आहेत.**

**१) ओरिजनल सेल डीड नं - MVL 8/86/2022 दि. 9/12/2022**

**२) ओरिजनल सेल डीड नं - TNN3 -6452/2020**

**३) ओरिजनल चेन ऑफ डॉक्युमेंटस्, शॉप नं 9, सरगम अपार्टमेंट, सीएचएसएल, प्लॉट नं 35 आणि 36, सेक्टर 9, कामोठे, पनवेल, रायगड 410206**

**४) ओरिजनल कागदपत्रे प्लॉट नं 102, पहिला मजला, A/7, फॉरच्युन कॅलिप्सो, केवाळे, ता- पनवेल-410206**

**उपरोक्त नमुद ओरिजनल कागदपत्रे कुणाला सापडल्यास खालील पत्यावर आणून द्यावीत हि विनंती.**

**कौशिक रमेशचंद्र अनम**
**श्री साई सदन, दुसरा मजला, प्लॉट नं-28**
**सेक्टर 10, खांदा कॉलनी पनवेल 410206**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे मोहपे, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार सीमा वेंकट अय्यर, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे मोहपे, तहसील पनवेल जिल्हा रायगड परिषद रायगड, पंचयात समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| २९/२ | १ | ०.२४.५० | ०.०२.३० | ०.२६.८० | ५.६९ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०३/०१/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
( खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
मोबाईल : ८८८८२७१७५९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे मोहपे, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री एल. आर. व्यंकटरमण, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे मोहपे, तहसील पनवेल जिल्हा रायगड परिषद रायगड, पंचयात समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| २३ | १ | ०.२१.०० | ०.०१.८० | ०.२२.८० | ४.८१ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०३/०१/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
( खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
मोबाईल : ८८८८२७१७५९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे मोहपे, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार सीमा वेंकट अय्यर, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे मोहपे, तहसील पनवेल जिल्हा रायगड परिषद रायगड, पंचयात समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| २९/१/अ | १ | ०.६०.७० | ०.०४.६० | ०.६५.३० | १३.६३ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०३/०१/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
( खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
मोबाईल : ८८८८२७१७५९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे पोयंजे, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री एल. आर. व्यंकटरमण, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे पोयंजे, तहसील पनवेल जिल्हा रायगड परिषद रायगड, पंचयात समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| ११ | १ | ०.५०.०० | ०.००.०० | ०.५०.०० | ०.८४ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०३/०१/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
( खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
मोबाईल : ८८८८२७१७५९

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे मोहपे, तहसील- पनवेल, जिल्हा- रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री एल. आर. व्यंकटरमण, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे:

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे मोहपे, तहसील पनवेल जिल्हा रायगड परिषद रायगड, पंचयात समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील**

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | पोटखराबा हे.आर.प्रती | एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| २ | १ | ०.८०.७० | ०.१२.१० | ०.९२.८० पैकी विक्रीदार यांच्या मालकीचे ०-२०-८० | ४.३२ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०३/०१/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए., एल. एल. बी.
( खरेदीदाराचे वकील)

**कार्यालयीन पत्ता** - शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
मोबाईल : ८८८८२७१७५९

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **२१ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**

**मौजे - पाले बुद्रुक, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| जुना सर्व्हे नं/ हिस्सा नं. | नवीन सर्व्हे नं/ हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| ६१/५ | ४७/५ | ०-२५-६० पो.ख. ०-०१-५० एकूण ०-२७-१० | ५.२४ | अमिता जय आशर |

**पनवेल.**
**दिनांक : ०४/०१/२०२६**

**सही/-**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो.नं ९०२२३१७७७२

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **२१ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**जमिनीचे वर्णन**

**मौजे - मोर्बे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड.**

| सर्व्हे नं. गट नं. | हि.नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू.पै. | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १९ | २ | ०-१५-४० पो.ख. ०-०२-०० एकूण ०-१७-४० | १.९४ | श्री. वाळक्या काथोड पालकर |
| ३५ | - | ०-०१-०० पो.ख. ०-०२-०० एकूण ०-०३-०० | ०.०६ | |
| ७६ | ४ | ०-०५-१० पो.ख. ०-०१-५० एकूण ०-०६-६० | ०.१२ | |

**पनवेल.**
**दिनांक : ०४/०१/२०२६**

**सही/-**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर, नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो.नं ९०२२३१७७७२

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे- शिरढोण, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणेः

**- मिळकतीचे वर्णन -**

**मौजेः शिरढोण, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड**

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| शिरढोण | १. महादेव विठ्ठल भोपी २. अनुसया जोमा भोपी ३. संतोष जोमा भोपी ४. बेबी दशरथ ठोंबरे ५. उज्वला जोमा भोपी ६. मंजुळा विठ्ठल भोपी. ७. मनिषा अनंत भोपी. ८. धनश्री धनाजी भोपी ९. अविनाश धनाजी भोपी १० अमृता नंदकुमार नाईक ११ अलका सुरेश गावडे सर्व रा. शिरढोण, ता. पनवेल जि. रायगड | १२४ | ०.१२.०० ०.०२.०० ०.१४.०० | ०.२२ |
| | | १३८/५ | ०.०७.०० ०.००.०० ०.०७.०० | ०.०६ |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाणः पनवेल**
**दिनांकः ०३/०१/२०२६**

**सही/-**
**ॲड. सरिता महेंद्र साखरे**
पत्ता-०३, श्री हरेकृष्णा को. ऑ सोसायटी, प्लॉट नं.१२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६.

# नवी मुंबईत नवा इतिहास रचण्याची भाजप कार्यकर्त्यांना संधी -प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महानगरपालिका निवडणूक ही भाजपच्या कार्यकर्त्यांनी आजवर केलेल्या संघटनात्मक कामाची ताकद दाखवण्याची संधी असून, स्वबळावर लढवली जाणारी ही निवडणूक कार्यकर्त्यांसाठी प्रतिष्ठेची असल्याचे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले.

नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी शुक्रवारी नवी मुंबई येथे आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात भाजपाचे उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सविस्तर मार्गदर्शन केले.

या प्रसंगी वन मंत्री गणेश नाईक, नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, निवडणूक प्रमुख तथा माजी खासदार डॉ. संजीव नाईक, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार संदीप नाईक आदी या वेही उपस्थित होते.

महानगरपालिका निवडणूक ही शहराच्या विकासाचा नवा अध्याय लिहिण्याची संधी आहे. नामदार गणेश नाईक यांच्या नेतृत्वामध्ये नवी मुंबई महापालिकेची निवडणूक लढली जाते आहे. लोकहित, पारदर्शक प्रशासन आणि सर्वसमावेशक विकास हेच आपले ध्येय आहे, असे विचार व्यक्त करून प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. त्यांना ऊर्जा देण्याचे मोलाचे काम केले. नवी मुंबईतील भाजपचे कार्यकर्ते सक्षम असल्याचेही ते म्हणाले. नवी मुंबईमधील भाजपच्या सर्व उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभदेखील पार पडला. शिवसेनेसह विविध पक्षीयांचा भाजपात प्रवेश

कार्यकर्ता मेळावाप्रसंगी माजी शिवसेनेच्या माजी नगरसेविका ऋचाताई रामचंद्र पाटील तसेच शिवसेना बेलापूर संघटक रामचंद्र पाटील यांच्यासह विविध पक्षातील पदाधिकाऱ्यांनी भाजपामध्ये प्रवेश केला. शिवसेनेचे बेलापूर विधानसभा उत्तर भारतीय संघटक कमलेश वर्मा यांनीदेखील भाजपचा झेंडा हातात घेतला. प्रदेशाध्यक्ष चव्हाण आणि नामदार गणेश नाईक यांनी या सर्वांचे भाजपात स्वागत केले.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट यांचे नवी मुंबईतील ज्येष्ठ नेते सिद्राम ओव्हाळ आणि पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे नेते महेश खरे यांनी आज नवी मुंबई महापालिका निवडणुकीत भाजपाला पाठिंबा जाहीर केला. या दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करण्यासाठी प्रत्यक्षात प्रचारात उतरून परिश्रम घेणार आहेत.

# 'स्वीप' अंतर्गत शाळांमध्ये मतदार जनजागृती कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेच्या स्वीप उपक्रमांतर्गत मतदान जनजागृतीसाठी महापालिका शाळा क्र. २ दगडी शाळा, महानगरपालिका शाळा क्र. ११ उर्दू शाळा तक्का, शाळा क्रमांक ४ कोळीवाडा शाळा, मनपा शाळा ६ धाकटा खांदा येथे नुकतेच विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांमध्ये उत्साहाने सहभाग नोंदवून मतदानाबद्दल सकारात्मक संदेश दिला.

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने मतदान जनजागृतीसाठी निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत महापालिकेच्या क्षेत्रातील विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये चित्रकला, निबंध लेखन, पत्र लेखन, वक्तृत्व, रांगोळी आणि पोस्टर मेकिंग या प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या वेळी विद्यार्थ्यांनी सर्जनशील कल्पनांच्या माध्यमातून मतदानाचे महत्त्व, जबाबदारी आणि लोकशाही मूल्ये प्रभावीपणे मांडली.

येत्या १५ जानेवारीला महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये लोकशाही मूल्ये रुजावित, जबाबदार मतदाराचे व मतदानाचे महत्व लक्षात यावे, मतदानाबाबत जागरूकता वाढवावी या उद्देशाने मतदान जनजागृतीसाठीच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये महापालिकेच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.

संविधान व नागरिक कर्तव्यांची समज यामाध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणार आहे. आपले कुटुंब व समाजात मतदानाबाबत सकारात्मकतेने जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यात येत आहे.

# अजिवली येथे अखंड हरिनाम सप्ताह



**चिरनेर : प्रतिनिधी**

पनवेल तालुक्यातील अजिवली येथे नुकताच संत ज्ञानेश्वर माऊली सेवा मंडळ यांच्या वतीने कंठभूषण ह.भ.प. शांती ब्रम्हा एकनाथजी महाराज कोष्टी (देवाची आळंदी). यांच्या व्यासपीठ नेतृत्वा खाली अजीवली हायस्कुलच्या मैदानात भव्य दिव्य ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा संपन्न झाला.

या सप्ताहाच्या दिवसांत सकाळी ४ ते ६ काकड आरती,सकाळी ८ ते १०ज्ञानेश्वरी पारायण, संध्याकाळी ४ ते ६ व्याख्यान संध्याकाळी ६ ते ७ हरिपाठ. रात्रौ ९ ते ११ हरि कीर्तन असे दैनंदिन कार्यक्रम पार पडले.

या दिवसांत ह.भ.प.उद्धव महाराज चोले (बीड ),ह.भ.प.संजय म.वेळूकर (सातारा), ह.भ.प. विशाल महाराज खोले (मुक्ताई नगर), स्वामी राजेश्वरानंद सरस्वती शास्त्रीजी महाराज (अहिल्या नगर), ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर), ह.भ.प. गणेश महाराज भगत (पुणे ), ह.भ.प.सुदाम महाराज पानेगावकर (बीड) यांच्या सुश्राव्य कीर्तनाने श्रोते मंत्रमुग्ध झाले होते. दिंडी सोहळा व दीपोस्तव तसेच सांगता ह.भ.प.जयवंत महाराज बोधले (पंढरपूर) यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली.

संत ज्ञानेश्वर माऊली सेवा मंडळ अध्यक्ष ह.भ.प. विश्वनाथ रघुनाथ पाटील, उपाध्यक्ष महादेव हिरु सारडेकर, कार्याध्यक्ष दत्तात्रेय परशुराम पाटील, खजिनदार ह.भ.प.चंद्रकांत गोजे, संपर्क प्रमुख ह.भ.प.पुंडलिक शांताराम दुर्गे आदीसह १०८ सदस्य आदिनी विशेष मेहनत घेतली.

# राष्ट्रीय शॉर्ट फिल्म स्पर्धेत बीसीटी लॉ कॉलेज प्रथम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील बीसीटी कॉलेज ऑफ लॉच्या वतीने आयोजित संविधानिक कायद्यावर आधारित राष्ट्रीय शॉर्ट फिल्म निर्मिती स्पर्धेत भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉने घवघवीत यश संपादन केले आहे.

या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉची विद्यार्थिनी दीप्ती गायकवाड हिने डॉ. सानवी देशमुख मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेल्या उत्कृष्ट शॉर्ट फिल्मच्या माध्यमातून प्रथम क्रमांक पटकावला.

तिच्या सादरीकरणात संविधानिक मूल्ये, मूलभूत हक्क, न्याय, स्वातंत्र्य व सामाजिक जाणीव यांचे प्रभावी आणि अभ्यासपूर्ण चित्रण करण्यात आले होते, ज्यामुळे परीक्षकांनी तिच्या कामाचे विशेष कौतुक केले.

देशभरातील विविध कायदा महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. अशा प्रतिष्ठित राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणे ही भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ साठी गौरवाची बाब आहे.

उल्लेखनीय यश महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सानवी देशमुख मॅडम यांच्या सक्षम नेतृत्व, मार्गदर्शन आणि प्रेरणेमुळे शक्य. देशभरातील विविध कायदा महाविद्यालयांमध्ये झालेल्या तीव्र स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवणे ही बीसीटी लॉ कॉलेजसाठी अभिमानाची व गौरवाची बाब आहे.

या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या, प्राध्यापकवर्ग व विद्यार्थी समुदायाने कु. दीप्ती गायकवाड हिचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून तिच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# पनवेल रेल्वेस्थानकात सुरक्षेसाठी बॅग स्कॅनिंग मशिन्स कार्यान्वित



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वे स्थानकाच्या सुरक्षेसाठी पुन्हा एकदा अत्याधुनिक बॅग स्कॅनिंग मशिन्स बसवण्यात आल्या आहेत. बाहेरगावी प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या बॅगांची तपासणी या मशिन्सद्वारे करण्यात येणार आहे.

अनेक वर्षांपासून या मशिन्सची मागणी प्रवासी व नागरिकांकडून होत होती. पूर्वीही अशा मशिन्स बसवण्यात आल्या होत्या, मात्र देखभालीअभावी त्या खराब झाल्याने काढून टाकण्यात आल्या होत्या. सध्या पनवेल रेल्वे स्थानकात दररोज हजारो प्रवासी या

स्थानकावरून प्रवास करत असल्याने सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मात्र ज्या ठिकाणी या मशिन्स बसवण्यात आल्या आहेत, ते ठिकाण गैरसोयीचे असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. गर्दीचा विचार करता मशिन्सची जागा बदलण्यात यावी, अशी मागणी प्रवासी व नागरिकांकडून केली जात आहे.

# घणसोलीतील मनपा शाळेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई महानगरपालिका शाळा क्रमांक ७६ येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन ३ जानेवारी करण्यात आले होते. हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते शाळेतील मदतनीस ज्योती म्हात्रे यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगामुळे सर्व उपस्थितांमध्ये समानता, सन्मान आणि सामाजिक एकतेचा संदेश पोहोचला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर मनोगत व्यक्त केले. स्त्री शिक्षण, सामाजिक समता आणि अंधश्रद्धा निर्मूलनासाठी त्यांनी केलेल्या कार्याबद्दल विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडले. त्यामुळे कार्यक्रमाला शैक्षणिक व वैचारिक उंची प्राप्त झाली.



कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. सकाळ सत्राच्या प्रमुख पैनामा गुप्ता, वरिष्ठ शिक्षक विशाल यादव, सूत्रसंचालक घनश्याम जैस्वार यांच्यासह शिक्षक कृष्णा राठोड, धम्मदीप टेंभुर्ने, महिला शिक्षिका सारिका शिंदे, पद्मजा मोटे, जयश्री पाटील, संध्या यादव, ममता शर्मा, वंदना मिश्रा, कविता दुबे, अश्विनी पाटील आदी मान्यवर शिक्षकांनी कार्यक्रमास उपस्थिती लावून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये सावित्रीबाई फुले यांच्या विचारांची ओळख निर्माण होऊन समाजात शिक्षणाचे महत्त्व आणि स्त्री–पुरुष समानतेचा संदेश प्रभावीपणे पोहोचल्याचे चित्र दिसून आले.

# मतदान जागरूकता स्वाक्षरी अभियानाचा शुभारंभ



**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ मधील 'स्वीप' कार्यक्रमांतर्गत विविध विभागांमध्ये ठिकठिकाणी मोठ्या आकाराचे कोरे फलक उभारुन 'मतदान जागरुकता स्वाक्षरी अभियान' व्यापक स्वरुपात राबविण्यात येत आहे.

या अंतर्गत नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात, 'मतदान हा माझा अधिकार आणि तो मी बजावणार' असा संदेश लिहिलेल्या स्वाक्षरी फलकावर पालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ.कैलास शिंदे यांनी स्वाक्षरी करीत मतदान जागरुकता स्वाक्षरी अभियानाचा शुभारंभ केला आणि नवी मुंबईकर मतदारांना १५ जानेवारी रोजी मतदानाचा हक्क बजावण्याचे आवाहन केले.

या वेळी मुख्य निवडणूक निरीक्षक तथा महाराष्ट्र पेट्रोकेमिकल्स महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.भाऊसाहेब दांगडे यांनीही फलकावर स्वहस्ताक्षरात स्वाक्षरी करुन मतदान करण्याचा संदेश प्रसारित केला.

या वेळी उपस्थित महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व डॉ. राहुल गेठे, शहर अभियंताशिरीष आरदवाड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे, प्रशासन विभागाचे उपआयुक्त किसनराव पलांडे, सहा.संचालक नगररचना सोमनाथ केकाण, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त तथा निवडणूक विषयक स्वीप कार्यक्रमाचे नोडल अधिकारी डॉ.अजय गडदे, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, मालमत्ता कर विभाग उपआयुक्त डॉ. अमोल पालवे, परिवहन व्यवस्थापक योगेश कडुस्कर, अतिक्रमण विभागाचे उपायक्त डॉ. कैलास गायकवाड, उद्यान विभाग उपआयुक्त स्मिता काळे, शिक्षण विभाग उपायुक्त संघरत्ना खिल्लारे, कार्यकारी अभियंता प्रविण गाडे, आणि इतर विभागप्रमुख व इतर अधिकारी उपस्थित होते.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने निवडणूक विषयक 'मतदान जागरुकता अभियान अर्थात स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत असून स्वाक्षरी मोहीम हा त्याचाच एक भाग आहे. याकरिता नागरिकांची मोठया संख्येने उपस्थिती असते अशा वर्दळीच्या ठिकाणांवर 'मतदान हा माझा अधिकार आणि तो मी बजावणार' असा संदेश लिहिलेले स्वाक्षरी फलक लावण्यात आले असून नागरिकांनी यावर आपली स्वाक्षरी करुन आपण मतदान करणारच हा निश्चय दृढ करावा आणि इतरांनाही मतदानाचा हक्क बजावण्याचा संदेश द्यावा, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.



# गव्हाण विद्यालयात ज्ञानज्योती सावित्रीबाई फुलेंना अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्त्री शिक्षणाच्या उद्धारकर्त्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिवस बालिका दिन म्हणूनही साजरा करण्यात आला.

शनिवार, ३ जानेवारी २०२६ रोजी कर्मवीर विद्याप्रबोधिनी प्रमाणपत्र परीक्षेसाठी बाह्य तज्ज्ञ परीक्षक म्हणून आलेले जासई हायस्कूल चे शिक्षक केतन भोईर यांचे शुभ हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलें यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

विद्यालयाच्या प्राचार्या व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख संजय उगले आणि सर्व सेवक बंधू भगिनींने क्रांतीज्योती सावित्रीबाईंच्या प्रतिमेसमोर नतमस्तक होवून विनम्र अभिवादन केले.

इयत्ता आठवी ब च्या वर्गाने हा कार्यक्रम साजरा केला. वर्गशिक्षिका दर्शना माळी यांनी प्रतिमेला श्रीफळ अर्पण वाढवून अभिवादन केले.

# ज्येष्ठ नागरिक संघाचा वर्धापन दिन उत्साहात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला दिवाळे कोळीवाड्यातील ज्येष्ठ नागरिक संघाच्या विरंगुळा केंद्राचा दुसरा वर्धापन दिन गुरुवारी (दि.१) धार्मिक आणि सांस्कृतिक वातावरणात उत्साहात साजरा करण्यात आला. टाळ–मृदुंगाच्या गजरात प्रतिमा पूजन, पारंपरिक आरती, दीपप्रज्वलन, हरिपाठ, आणि भजन तसेच तीर्थप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.



या वेळी विविध सामाजिक व सार्वजनिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नागरिकांचा गौरव करण्यात आला तसेच मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. संस्थेच्या माध्यमातून गेल्या दोन वर्षांत आरोग्य शिबिरे, रक्तदान शिबिरे, नेत्र तपासणी शिबिरे तसेच दैनंदिन हरिपाठ असे विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. सध्या संस्थेचे १५६ हून अधिक सभासद असून सर्व सामाजिक उपक्रमांत ते उत्स्फूर्त सहभाग घेत आहेत.

ज्येष्ठ नागरिकांनी आनंदी व आरोग्यदायी जीवन जगावे, या उद्देशाने नुकतेच पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, गाणगापूर व आई एकविरा देवी या पवित्र तीर्थक्षेत्रांची दर्शन यात्रा आयोजित करण्यात आली होती. तसेच स्मार्ट व्हिलेज गाव दत्तक योजनेंतर्गत विरंगुळा केंद्राच्या परिसरात ज्येष्ठ नागरिकांसाठी ओपन जिमची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यावेळी आमदार मंदाताई म्हात्रे यांनी, मतदारसंघातील ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा अधिकाधिक लाभ मिळावा यासाठी पुढील काळात आणखी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, असे आश्वासन दिले.

या वर्धापन दिन सोहळ्यास नवी मुंबई महानगरपालिका समाज विकास विभागाचे उपायुक्त किसनराव पालांडे, समाज विकास अधिकारी बाबासाहेब भोसले, स्थानिक नगरसेविका भारती कोळी, मा. नगरसेवक मिथुन पाटील, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष चंद्रकांत कोळी, पांडुरंग पाटील, सुरेश कोळी, वरून नाईक, उमेश नाईक, शंकर नाईक, मनोहर कोळी, सुधीर कोळी, प्रवीण मार्के, परशुराम पाटील, अनंता बोस, प्रवीण कोळी, भास्कर कोळी, महादेव कोळी, यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी, सादर केलेल्या श्री ज्ञानराज प्रासादिक भजन मंडळ, श्री संत ज्ञानेश्वर भजन मंडळ यांच्या भजनांनी कार्यक्रमाला रंगत आणली.

# दक्षिण काशी हरिहरेश्वरमध्ये भग्न मूर्ती

## श्रद्धा जपा, संग्रहालय उभारा; भाविकांची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हरिहरेश्वर या पवित्र तीर्थक्षेत्राला निसर्गाने अथांग, स्वच्छ आणि मनोहारी समुद्रकिनारा बहाल केला आहे. मंदिर, समुद्र आणि अध्यात्म यांचा सुरेख संगम असलेल्या या ठिकाणी राज्यभरातून तसेच परराज्यातून हजारो भाविक आणि पर्यटक नियमितपणे दर्शनासाठी येत असतात, मात्र अलीकडच्या काळात हरिहरेश्वर तीर्थक्षेत्र प्रदक्षिणा मार्ग व समुद्रकिनाऱ्यावर दिसून येणाऱ्या भग्नावस्थेतील देव-देवतांच्या मूर्ती भाविकांच्या मनात तीव्र वेदना आणि अस्वस्थता निर्माण करत आहेत.



हरिहरेश्वर आणि दिवेआगर ही श्रीवर्धनमधील प्रमुख धार्मिक-पर्यटनस्थळे मानली जातात. दिवसेंदिवस पर्यटकांची संख्या वाढत असताना पायाभूत सुविधा, स्वच्छता आणि धार्मिक संवर्धनाच्या मुद्द्यांकडे अपेक्षित लक्ष दिले जात नसल्याची भावना भाविकांमधून व्यक्त होत आहे. विशेषतः हरिहरेश्वरच्या समुद्रकिनाऱ्यावर विविध देव-देवतांच्या मूर्ती तुटलेल्या, भग्न अवस्थेत आणि अस्ताव्यस्त पडलेल्या दिसून येतात. या दृश्यांमुळे श्रद्धा दुखावली जात असून ही केवळ दुर्लक्षाची बाब नाही, तर धार्मिक संवेदनशीलतेचा गंभीर प्रश्न आहे, अशी प्रतिक्रिया अनेक भाविकांनी दिली.

जिल्ह्यातील अनेक प्राचीन मंदिरे काळानुसार जीर्णोद्धारासाठी घेतली जातात. काही ठिकाणी देवदेवतांच्या मूर्ती कालांतराने झिजलेल्या किंवा खराब झालेल्या असतात. धार्मिक परंपरेनुसार अशा मूर्ती हरिहरेश्वरसारख्या पवित्र स्थळी समुद्रात विसर्जित केल्या जातात. या विसर्जनामुळे मोक्ष प्राप्त होतो, अशी श्रद्धा आहे, मात्र समुद्राच्या प्रचंड लाटांमुळे या मूर्ती पुन्हा किनाऱ्यावर येतात आणि कालांतराने त्या भग्न अवस्थेत उघड्यावर पडून राहतात.

सध्या तीर्थक्षेत्र प्रदक्षिणा मार्ग व समुद्रकिनाऱ्यावर अशा अनेक मूर्ती आणि शिल्पे विखुरलेल्या अवस्थेत आढळून येत आहेत. या मूर्तींचे असे विदारक दृश्य पाहून भाविकांनी दुःख, खंत आणि नाराजी व्यक्त केली आहे. ही शिल्पे केवळ दगड नसून श्रद्धेची, इतिहासाची आणि संस्कृतीची साक्ष आहेत, असे मत अनेक जाणकार नागरिक आणि पर्यटकांनी मांडले.

या पार्श्वभूमीवर भग्न अवस्थेतील मूर्तींचे शास्त्रशुद्ध जतन व संवर्धन करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. समुद्रकिनाऱ्यावर किंवा प्रदक्षिणा मार्गावर उघड्यावर पडलेल्या मूर्ती एकत्र करून त्यांचे स्वतंत्र संग्रहालय किंवा दर्शन केंद्र उभारावे, अशी ठाम अपेक्षा भाविक आणि पर्यटक व्यक्त करीत आहेत. यामुळे मूर्तींचा सन्मान राखला जाईल, भाविकांना दर्शनाची सुविधा मिळेल आणि हरिहरेश्वरच्या धार्मिक व सांस्कृतिक वारशाचे जतनही होईल.

# माथेरानमध्ये हुतात्म्यांना अभिवादन

**माथेरान : बातमीदार**

माथेरानचे भूमिपुत्र वीर हुतात्मा विठ्ठलराव ऊर्फ भाई कोतवाल यांनी स्वातंत्र्यलढ्याची पाने सुवर्ण अक्षरांनी लिहिली होती. त्यांच्या ८३व्या पुण्यतिथीनिमित्ताने २ जानेवारी रोजी माथेरानमधील नौरोजी उद्यानात आदरांजली वाहण्यात आली.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७९ वर्ष पूर्ण झाली आहेत. १०५ हुतात्म्यांमध्ये माथेरानचे वीर सुपूत्र भाई कोतवाल हेसुद्धा होते. त्यांच्या देशसेवेच्या कार्याची महती युवा पिढीला ज्ञात असावी यासाठी मुरबाड तालुक्यातील सिद्धगड येथे हौतात्म्य पत्करलेले भाई कोतवाल आणि हुतात्मा हिराजी पाटील यांना अभिवादन करण्याकरिता २ जानेवारी रोजी छोटेखानी कार्यक्रम आयोजित करण्यात येतो.

माथेरानमध्ये २ जानेवारी रोजी पहाटे ५.३० वा. नौरोजी उद्यानातून मशाल फेरी काढण्यात आली, तर पहाटे ६.०२ वाजता नवनिर्वाचित नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या हस्ते पुण्यज्योत प्रज्वलित करून हुतात्मा भाई कोतवाल यांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित नागरिकांनी भाई कोतवाल यांच्या अर्ध पुतळ्याला पुष्पांजली वाहून अभिवादन केले.

स्वातंत्र्यसैनिक स्तंभास नगरसेवक सुनील शिंदे आणि नगरसेविका ऐश्वर्या शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. वीर हुतात्मा भाई कोतवाल नगर परिषद शाळेत स्व. सुभेदार विनय धनावडे यांच्या शिल्पास नगरसेविका प्रतिभा घावरे व सुरेखा साळुंखे यांनी, हुतात्मा स्मारक येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल आणि वीर हुतात्मा हिराजी पाटील यांच्या प्रतिमेस नगरसेविका अर्चना भिल्लारे व कमल गायकवाड यांनी पुष्पहार अर्पण केला तसेच येथील स्वातंत्र्यसैनिकांच्या नामफलकास नगरसेविका लता ढेबे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.



याचबरोबर येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल आणि वीर हुतात्मा हिराजी पाटील यांच्या शिल्पास नगरसेवक सोहेल महापुळे, नगरसेविका रिजवना शेख यांनी पुष्पहार अर्पण केला. या पवित्र कार्यक्रमावेळी माथेरानमधील नागरिक, राजकीय पक्ष प्रतिनिधी, नगर परिषद कर्मचारी, दोन्ही शाळेचे विद्यार्थी शिक्षक आणि वीर हुतात्मा भाई कोतवाल यांचे नातेवाईक उपस्थित होते.

# 'अंनिस' पेण शाखेचा अनोखा उपक्रम

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, पेण शाखेने दरवर्षीप्रमाणे बुधवार दिनांक ३१ डिसेंबर रोजी चला व्यसनाला बदनाम करू या उपक्रमाचे आयोजन केले होते.

उपक्रमाचा उद्देश तरुणांनी व्यसनापासून दूर राहावे हा होता, कारण ३१ डिसेंबरपासून नवतरुण व्यसन करायला सुरवात करतो आणि मग पुढे व्यसनाधीन होतो, म्हणून ३१ डिसेंबर हा दिवस व्यसनमुक्ती दिवस 'अंनिस' साजरा करते. या दिवशी नागरिकांना आवाहन केले जाते की, आजपासून दारू नको, तर दूध प्या.



कार्यक्रमाची सुरवात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलनाच्या सक्रिय कार्यकर्त्या सावनी गोडबोले यांच्या हस्ते नागरिकांना मसाले दूध वाटपाने करण्यात आली. या वेळी 'अंनिस'चे जिल्हा कार्याध्यक्ष संदेश गायकवाड यांनी, ज्यांना दारू सोडायची आहे त्यांनी आमच्याशी संपर्क साधा आणि व्यसनापासून दूर राहून कुटूंब सुखी करा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाला प्राचार्य सतीश पोरे, एन.जे. पाटील, पेण शाखेचे अध्यक्ष नितीन निकम, डॉ. प्राध्यापक शेख, सूर्यकांत पाटील, आदेश पाटील, अ‍ॅड. संकल्प गायकवाड, गीता भानुशाली, राजरत्न लोखंडे, तेजस राऊत, पवार, रामकांत घरत आदी उपस्थित होते.

# खोपोली येथे बिबट्याचा वावर

**चौक : प्रतिनिधी**

अखेर बिबट्या दिसला ही अफवा खरी ठरली असून खोपोली परिसरातील पटेल नगर येथे बिबट्याचे दर्शन झाले, मात्र तो छोटा बछाडा असल्याचे सांगण्यात आले.

या पार्श्वभूमीवर वनविभाग परिक्षेत्र खालापूर परिमंडळ खोपोली यांनी काही सूचना प्रसारित केल्या आहेत. यामध्ये रात्रीचे अंधारात फिरु नये, उघड्यावर शौचास जाऊ नये, अन्नपदार्थ किंवा तत्सम वस्तू उघड्यावर टाकू नये, वय वर्ष १ ते १५ आतील मुलांना एकटे बाहेर पाठवू नये तसेच बिबट्या आढळून आल्यास वनविभागास तत्काळ कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

बिबट्या असल्याची प्रत्यक्ष पाहणी करून व त्याच्या नैसर्गिक माहितीवरून खात्री असल्याचे वन विभागाचे अधिकारी पवार यांनी सांगितले. कुणीही अफवा उठवू नये, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# प्राचार्य जाधव यांचा सेवापूर्ती सन्मान

**माणगाव : बातमीदार ,प्रतिनिधी**

अशोकदादा साबळे विद्यालय व माणगाव ज्युनिअर कॉलेज, माणगाव येथील प्राचार्य डी. एम. जाधव हे ३१ डिसेंबर २०२५ रोजी नियत वयमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या ३३ वर्षे ३ महिने २३ दिवसांच्या निष्ठावान व उल्लेखनीय सेवेनिमित्त संस्था व कर्मचाऱ्यांच्या वतीने शनिवारी (दि. ३) सेवापूर्ती स्वागत व सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

जाधव यांनी सन १९९२पासून शिक्षक म्हणून सेवेला सुरुवात करून पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक व प्राचार्य म्हणून कार्य केले. त्यांच्या कार्यकाळात शाळा व कॉलेजमध्ये शैक्षणिक, क्रीडा व



भौतिक सुधारणा झाल्या असून अनेक विद्यार्थी क्रीडा क्षेत्रात राज्यस्तरापर्यंत पोहचले.

मूळचे आंबेवाडी येथील असलेल्या जाधव यांचे शिक्षण आंबेवाडी, औराद, उदगीर, उमरगा तसेच छत्रपती संभाजीनगर व लातूर येथे झाले. शिक्षणाबरोबरच सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. उत्कृष्ट वक्ते व सूत्रसंचालक म्हणून त्यांची ओळख असून शिक्षक-कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष, सचिव व सल्लागार तसेच पंचायत समितीचे शिक्षण सल्लागार म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.

सन २०१६मधील कोपर्डी घटनेनंतर मराठा क्रांती मूक मोर्चाचे माणगाव येथील नेतृत्व त्यांनी केले. २००७मध्ये मराठा कर्मचारी मित्र मंडळाची स्थापना करून माणगाव येथे शिवजयंती महोत्सव अखंड सुरू ठेवण्यात त्यांचे योगदान आहे. अनेकांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# नववर्षी मॉर्निंग क्लबने केला नियमित चालणाऱ्या ज्येष्ठांचा सन्मान

## प्लास्टिक पिशवी न वापरण्याचाही संकल्प

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा येथील मॉर्निंग क्लबने नववर्षाच्या पहाटे येथील कुंडलिका नदी किनारी ट्रॅकवर नियमित चालायला येणाऱ्या ज्येष्ठांचा यथोचित सन्मान केला. या वेळी मॉर्निंग क्लबच्या सदस्यांनी नववर्षाच्या पहिल्या दिवसापासून प्लास्टिक पिशवी न वापरण्याचा संकल्प केला असल्याचे अध्यक्ष प्रज्योत गुरव यांनी जाहीर केले.

रोहा शहरातील कुंडलिका नदी किनारी ट्रॅकवर सकाळी फिरायला, मॉर्निंग वॉककरिता अनेकजण येत असतात. येथील मॉर्निंग क्लबने 'चला आरोग्य जपूया, रोज चालण्याची सवय लावूया' हा मूलमंत्र देत नवीन वर्षाच्या सकाळी मॉर्निंग क्लबच्या सदस्यांनी एकत्र येत वॉकसाठी येणाऱ्या सर्वांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. वॉकिंग ट्रॅकवर



आयोजित छोटेखानी कार्यक्रमात रोहा सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब यांच्या हस्ते रवींद्र वैद्य, विजय देसाई, चंद्रकांत जाधव या नियमित वॉकसाठी येणाऱ्या ज्येष्ठांचा सन्मान करण्यात आला.

या वेळी सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष परब, मॉर्निंग क्लबचे अध्यक्ष गुरव, पत्रकार मिलिंद अष्टीवकर यांनी मनोगत व्यक्त केले. मॉर्निंग क्लब मेंबर्स आजपासून प्लास्टिक पिशवी वापरणार नसल्याचा संकल्प सोडण्यात आला. क्लबचे सरचिटणीस शैलेश कोळी यांनी नियोजन केले, तर रत्नाकर कनोजे यांनी आभार मानले.

या वेळी फारुक सवाल, समिधा अष्टीवकर, गणेश सावंत, किरण गुल्हाने, प्रज्ञेश भांड, वामन चव्हाण, भाई पाटील, बाबू कडू, ऋतुराज अष्टीवकर, प्रवीण कापडी आदी उपस्थित होते.

> **प्लास्टिक बंदी व्हावी यासाठी सिटीझन फोरम ट्रस्ट कायम प्रयत्नशील आहे. अशा उपक्रमातून त्याची निश्चितच जनजागृती होईल, पहाटे चालणे हा निरोगी आणि आनंदी जीवनासाठी एक सोपा व प्रभावी मार्ग आहे, जो शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. मॉर्निंग क्लबच्या माध्यमातून नवोदितांना निश्चितच प्रेरणा मिळेल.**
> **-नितीन परब, अध्यक्ष रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट**

# पद्मदुर्गवर डॉक्युमेंटरी फिल्म; किल्ल्याचा इतिहास सर्वांना कळणार


**मुरूड : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अद्वितीय सागरी धोरणाचे आणि दूरदृष्टीचे जिवंत प्रतीक असलेल्या पद्मदुर्ग किल्ल्यावर आधारित पहिलीच ऐतिहासिक डॉक्युमेंट्री फिल्म बनवण्यात आली आहे. इतिहासाच्या प्रवाहात दुर्लक्षित राहिलेल्या या किल्ल्याचा खरा इतिहास, त्याची उभारणी, बुरुज व तोफांची रचना, कोटेश्वरी मंदिर, तसेच जंजिराशी निगडित असलेला अपप्रचार या सर्वांचा वस्तुनिष्ठ व पुराव्यांसह उलगडा या डॉक्युमेंटरीत करण्यात आला आहे.

मुरुड तालुक्यात दोन सुप्रसिद्ध किल्ले आहेत. जंजिरा किल्ला व पदमदुर्ग असे हे किल्ले आहेत. जंजिरा किल्ला हा समुद्रापासून जवळ, तर पदमदुर्ग किल्ला हा पाण्यापासून चार किलोमीटरच्या अंतरावर आहे. पद्मदुर्ग किल्ला हा जंजिरा किनाऱ्यावर स्थित एक ऐतिहासिक समुद्री किल्ला आहे. हा किल्ला १६७६मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी सिद्दींच्या जंजीरा किल्ल्याला आव्हान देण्यासाठी बांधला होता.

पद्मदुर्ग किल्ला सिद्दीच्या जंजिरा किल्ल्याच्या वायव्य दिशेला चार किमी अंतरावर स्थित आहे. हा किल्ला छत्रपती शिवाजी महाराजांनी सिद्दीच्या वाढत्या सामर्थ्याला आव्हान देण्यासाठी आणि अरबी समुद्रातील नौदल गतिविधी नियंत्रित करण्यासाठी बांधला होता. पद्मदुर्गचे क्षेत्र नऊ एकर आहे. किल्ल्याच्या संरक्षणासाठी तीन स्तरांची व्यवस्था आहे. बाह्य किलेबंदी, एक वेगळा पडकोट आणि आतील किल्ला अशी व्यवस्था आढळून येते.

पद्मदुर्गाची खरी ओळख जनतेपर्यंत पोहचवणे, शिवरायांचा सागरी वारसा जपणे आणि मुरुडच्या पर्यटनाला नवी दिशा देणे हाच या ऐतिहासिक उपक्रमाचा मुख्य संकल्प असून मुरुड माझा प्रस्तुत या डॉक्युमेण्ट्री फिल्मला श्री शिवछत्रपतींचा पदमदुर्ग असे नाव देण्यात आले आहे. या डॉक्युमेंट्रीचे निर्माता व संकल्पना प्रवेश श्रीकांत पालशेतकर हे आहेत.



# वावर्लेत महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर

**चौक : प्रतिनिधी**

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, पाताळगंगा व रिलायन्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी मूलभूत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन वावर्ले प्राथमिक आरोग्य केंद्र येथे यशस्वीरित्या पार पडले.

या शिबिरामध्ये महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या सीबीसी (पूर्ण रक्ततपासणी), आरबीएस (रॅण्डम रक्तातील साखर तपासणी), पॅप स्मिअर तपासणी, स्तन तपासणी (ब्रेस्ट स्क्रिनिंग) करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपणदेखील करण्यात आले.

या उपक्रमासाठी रिलायन्स इंडस्ट्रीज लि.कडून डॉ. रणजित खंडारे (मॅनेजर



डमिनिस्ट्रेशन), डॉ. विष्णू बुलबुले (वैद्यकीय अधिकारी), मनाली कवडे व पप्पूलाल पुनिया (नर्सिंग ऑफिसर), रिलायन्स फाउंडेशनकडून डॉ. तेजस्विनी, निलेश अस्मार (सामाजिक कार्यकर्ता), सुजाता शिंदे (कॅम्प को ऑर्डिनेटर), वावर्ले प्राथमिक आरोग्य केंद्र येथील डॉ. कल्याणी इंगोले (तालुका आरोग्य अधिकारी, खालापूर)डॉ. प्रसाद रोकडे (वैद्यकीय अधिकारी, वावर्ले) डॉ. प्रतिभा देशमुख, डॉ. तांडेल यांनी कामकाज केले.

महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे व प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा गावपातळीवर पोहचवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे, असे डॉ. खंदारे यांनी सांगितले.

# महाडचे नगराध्यक्ष कविस्करांनी स्वीकारला पदभार

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगर परिषदेवर शिवसेना शिंदे गटाने सत्ता स्थापन केल्यानंतर शुक्रवारी (दि.२) नवनिर्वाचित नगराध्यक्ष सुनील कविस्कर यांनी पालिकेच्या दालनात झालेल्या छोटेखानी सोहळ्यात पदाचा कार्यभार स्वीकारला. या वेळी त्यांनी महाडकरांचे आभार व्यक्त केले.

नुकत्याच झालेल्या महाड नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये नगराध्यक्षपद शिवसेनेने खेचून घेतल्यानंतर शुक्रवारी निवडून



आलेले नगराध्यक्ष सुनील कविस्कर यांनी पदग्रहण केले. या पदग्रहण सोहळ्यासाठी सुषमा गोगावले, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, अरुण चाळके, चंद्रकांत कळंबे, नितीन पावले आदी पदाधिकारी उपस्थित होते. गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत कविस्कर यांनी नगराध्यक्ष दालनात खुर्चीचा स्वीकार केला. नगराध्यक्षांबरोबरच शिवसेना शिंदे गटाच्या आठ नगरसेवकांचेदेखील स्वागत या वेळी करण्यात आले.

पदग्रहण केल्यानंतर नगराध्यक्ष सुनील कविस्कर यांनी तमाम महाडकरांचे आभार मानून विकासकामे करत असताना राजकारणविरहित कामे केली जातील आणि महाडचा विकास महाराष्ट्राला शोभून दिसेल अशा प्रकारे विकास केला जाईल असे आश्वासित केले. काही कारणास्तव मंत्री भरत गोगावले आणि पुत्र विकास गोगावले हे दोघेही अनुपस्थित राहिल्याने कविस्कर भावूक झाले होते.

# ‘केकेआर’मधून मुस्तफिजुर आऊट

## बीसीसीआयचा मोठा निर्णय; संघ मालक शाहरूख खानला झटका

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिजुर रहमानला आयपीएलमधील कोलकाता नाइट रायडर्स संघातून वगळण्याचे निर्देश भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) दिले आहेत. शाहरुख खानच्या मालकीच्या केकेआर संघाला मुस्तफिजुरला रिलीज करण्यास सांगण्यात आले असून त्याच्या बदल्यात दुसरा खेळाडू घेण्याची परवानगीही बोर्डाकडून देण्यात आली आहे.



बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी याबाबत अधिकृत माहिती देताना सांगितले की, सध्याची परिस्थिती लक्षात घेता केकेआर संघाने मुस्तफिजुर रहमानला रिलीज करावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. संघाला हवे असल्यास पर्यायी खेळाडू घेण्याची मुभा दिली जाईल.

अलीकडे बांगलादेशमध्ये हिंदूंवर झालेल्या हिंसाचाराच्या घटनांमुळे भारतात असंतोष पसरला आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या फोटो-व्हिडिओंमुळे संताप वाढला आणि अनेक संघटनांनी बांगलादेशी खेळाडूंना आयपीएल २०२६मध्ये खेळू देऊ नये, अशी मागणी केली. या पार्श्वभूमीवर मुस्तफिजुर रहमानला ‘केकेआर’मधून वगळण्याचा दबाव वाढला.

या मुद्द्यावरून काही राजकीय नेत्यांनीही थेट शाहरुख खान आणि केकेआर व्यवस्थापनावर टीका केली होती.

मुस्तफिजुर रहमानला केकेआरने डिसेंबर २०२५मध्ये झालेल्या मिनी लिलावात तब्बल ९.२० कोटी रुपयांना खरेदी केले होते. त्याची बेस प्राइस दोन कोटी रुपये होती. चेन्नई सुपर किंग्स आणि दिल्ली कॅपिटल्ससोबत चुरशीच्या बोलीनंतर केकेआरने त्याला संघात घेतले होते. डेथ ओव्हर्समध्ये प्रभावी गोलंदाजी करणारा मुस्तफिजुर आयपीएलसाठी ‘मॅच-विनर’ ठरू शकतो, असा विश्वास संघ व्यवस्थापनाला होता.

मुस्तफिजुर रहमान २०१६पासून आयपीएल खेळत आहे. सनरायझर्स हैदराबाद, मुंबई इंडियन्स, राजस्थान रॉयल्स, दिल्ली कॅपिटल्स आणि चेन्नई सुपर किंग्स अशा संघांकडून तो खेळला आहे.

### भारताचा बांगलादेश दौरा स्थगित

भारत आणि बांगलादेश यांच्यातील दुरावलेल्या संबंधांच्या पार्श्वभूमीवर बीसीसीआयने टीम इंडियाचा संघाचा बांगलादेश दौरा स्थगित केला आहे. या मालिकेत तीन वनडे आणि तीन टी-२० सामने खेळवले जाणार होते, मात्र सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीमुळे हा दौरा स्थगित झाला आहे. आता ही मालिका कधी खेळवायची याबाबत निर्णय केंद्र सरकारशी विचारविमर्श करूनच घेतला जाईल.

# हार्दिक पांड्याची तडाखेबंद फलंदाजी

■ एकाच षटकात कुटल्या ३४ धावा, शतकालाही गवसणी

**राजकोट : वृत्तसंस्था**

विजय हजारे स्पर्धेत बरोडा संघाकडून खेळताना भारतीय संघाचा धडाकेबाज अष्टपैलू क्रिकेटर हार्दिक पांड्याने विदर्भ संघाविरूद्ध दमदार शतक ठोकले. त्याने १३३ धावांची झंझावाती खेळी केली. त्याच्या खेळीतील एका षटकांत त्याने तब्बल पाच षटकार आणि एक चौकार ठोकत ३४ धावा जमवल्या. बीसीसीआय डोमेस्टिकने हा व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केला आहे.

बरोडा संघ २०व्या षटकांत ५ बाद ७१ धावसंख्येवर असताना हार्दिक पांड्या खेळायला आला. त्याने भाऊ कृणाल पांड्यासोबत ६५ धावांची भागीदारी केली. विदर्भकडून गोलंदाजी करणाऱ्या



पार्थ रेखाडेला हार्दिकच्या फटकेबाजी दणका बसला. हार्दिकने त्याच्या एका षटकात पहिल्या पाच चेंडूंवर पाच षटकार खेचले. सहाव्या चेंडूवर षटकार मारून सहा चेंडूत सहा षटकार मारण्याची संधी हार्दिककडे होती, पण शेवटच्या चेंडूवर हार्दिकला चौकाराने समाधान मानावे लागले. त्यामुळे हार्दिकला त्या षटकात तब्बल ३४ धावा मिळाल्या.

बरोडा संघाने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ९ बाद २९३ धावा केल्या. सलामीवीर नित्या पांड्या १५ धावांवर, तर अमित पस्सी शून्यावर बाद झाले. प्रियांशू मोलिया (१६), अतित शेठ (२१), कृणाल पांड्या (२३) आणि जितेश शर्मा (९) ही मधली फळीही स्वस्तात माघारी परतली. तोपर्यंत बरोडा संघ संथगतीने वाटचाल करत होता, पण हार्दिक पांड्या मैदानावर आला आणि त्याने सारा खेळच बदलून गेला. पांड्याने ६८ चेंडूत शतक पूर्ण केले. त्याने ९२ चेंडूत आठ चौकार आणि ११ षटकारांच्या मदतीने १३३ धावांची खेळी केली. त्यामुळे बरोडाने विदर्भला २९४ धावांचे लक्ष्य दिले.

# न्यूझीलंडविरुद्ध वनडे मालिकेसाठी टीम इंडिया जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघांची ११ जानेवारीपासून सुरु होणाऱ्या न्यूझीलंड संघाविरुद्ध तीन एकदिवसीय सामन्यांसाठी घोषणा करण्यात आली. हा भारतीय क्रिकेट संघाचा नवीन वर्षातील पहिला दौरा न्यूझीलंडविरुद्ध असेल. कॅप्टन शुबमनसोबत वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराज आणि उपकर्णधार श्रेयस अय्यर यांचाही संघात समावेश करण्यात आला आहे. तथापि, श्रेयस तंदुरूस्त घोषित झाला तरच तो मालिकेत सहभागी होऊ शकेल.


११ जानेवारीपासून न्यूझीलंड संघाविरुद्ध टीम इंडियाची तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका होणार आहे. त्यानंतर संघ पाच टी-२० सामने खेळणार आहे. टी-२० मालिकेसाठी भारतीय संघाची आधीच घोषणा करण्यात आली आहे. त्यानंतर शनिवारी (दि.३) एकदिवसीय मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा करण्यात आली.

शुबमन गिल एकदिवसीय मालिकेत संघाचे नेतृत्व करेल. दुखापतीमुळे गिल दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत सहभागी होऊ शकला नाही, त्यामुळे केएल राहुल कर्णधारपदी राहिला. भारताने ती मालिका २-१ अशी जिंकली. मोहम्मद सिराज आणि श्रेयस अय्यर परतले आहेत, पण अनुभवी वेगवान गोलंदाज मोहम्मद शमीला आणखी एक निराशा सहन करावी लागली आहे.

श्रेयसच्या पुनरागमनामुळे फॉर्मात असलेल्या ऋतुराज गायकवाड आणि तिलक वर्मा यांना संघातून बाहेर पडावे लागले आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा या अनुभवी खेळाडूंना या वनडे मालिकेसाठी संघात कायम ठेवण्यात आले आहे, मात्र वर्कलोड मॅनेजमेंटचा विचार करून वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि अष्टपैलू हार्दिक पांड्या यांना विश्रांती देण्यात आली आहे. त्यांच्या जागी मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा वेगवान गोलंदाजीची धुरा सांभाळतील.

नुकताच विजय हजारे ट्रॉफीत चांगली कामगिरी करणाऱ्या नीतीश कुमार रेड्डीला संघात स्थान मिळाले आहे. हर्षित राणा यालाही संघात सामील करून भारताने आपल्या वेगवान गोलंदाजीच्या फळीत विविधता आणण्याचा प्रयत्न केला आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये अपवादात्मक कामगिरी करणारे देवदत्त पडिककल आणि इशान किशन यांना संघात स्थान देण्यात आलेले नाही. ऋषभ पंतने संघात स्थान राखले आहे.

### गिल, सिराजचे कमबॅक, शमीकडे मात्र पुन्हा दुर्लक्ष






**असे आहे वेळापत्रक**

- ११ जानेवारी : पहिला सामना, वडोदरा
- १४ जानेवारी : दुसरा सामना, राजकोट
- १८ जानेवारी : तिसरा सामना, इंदूर

### होल्डरने टाकला अजब चेंडू

**शारजा :** वेस्ट इंडिजचा माजी कर्णधार जेसन होल्डर सध्या आयएलटी २० लीगमध्ये खेळत आहे. तो दुबई कॅपिटल्सचा सामना करणाऱ्या अबू धाबी नाईट रायडर्सचा भाग आहे. या सामन्यात होल्डरने असा चेंडू टाकला की सारेच अवाक् झाले.



होल्डर दुबई कॅपिटल्सविरुद्ध गोलंदाजी करत होता. एका षटकात होल्डर गोलंदाजी करण्यासाठी आला तेव्हा चेंडू त्याच्या हातातून निसटला घसरला आणि उंच उडून थेट चौथ्या स्लिपमध्ये गेला. चेंडू फलंदाज किंवा यष्टीरक्षकापर्यंत पोहचलाच नाही. चेंडू थेट चौथ्या स्लिपच्या जागेवर जाऊन पडला. हे ऐकून होल्डर स्वतः आश्चर्यचकित झाला. तो स्वतःच घडलेल्या प्रकारावर हसू लागला. चेंडू फलंदाजाच्या डोक्यावरून बराच वर गेल्याने पंचांनी तो नो बॉल दिला.

स्व. उमेश शेणॉय चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

# गुड मॉर्निंग स्पोर्ट्स संघ मानकरी

**मुंबई : प्रतिनिधी**

गुड मॉर्निंग स्पोर्ट्स संघाने अमरहिंद मंडळ आयोजित स्व. उमेश शेणॉय चषक राज्यस्तरीय कुमार कबड्डी स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. याच संघाचा दवेश गवळी स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. त्याला सायकल देऊन गौरविण्यात आले.



दादर(प.) येथील मंडळाच्या पटांगणार सुरू असलेल्या कुमारांच्या अंतिम सामन्यात मुंबईच्या गुड मॉर्निंग स्पोर्ट्सने अटीतटीच्या लढतीत पूर्वार्धातील ११-१३ अशा दोन गुणांच्या पिछाडीवरून ठाण्याच्या ग्रीफिन्स जिमचा प्रतिकार ३२-२८ असा मोडून काढत स्व. उमेश शेणॉय चषक व ३० हजार रुपये आपल्या खात्यात जमा केले. उपविजेत्या संघाला चषक व २० हजार रुपयांवर समाधान मानावे लागले.

पूर्वार्धात पिछाडीवर पडलेल्या गुड मॉर्निंगने उत्तरार्धात आपला खेळ गतिमान केला आणि लोण देत आपला विजय साजरा केला. हा लोण देत असताना त्यांनी पाच बोनस गुणदेखील वसुल केले व एक अव्वल पकड केली.

दिवेश दळवी, सुजन दळवी यांच्या संयमी चढाया त्यांना श्रवण तिरोडकर, आदित्य धुमाळ यांची मिळालेली पकडीची साथ यामुळे हे शक्य झाले. मनीष धनावडे, आदित्य पिलाने यांचा पूर्वार्धातील चढाईचा जोश उत्तरार्धात मावळला, तर वेदान्त ढमाले, तन्मय पवार यांचा बचावदेखील दुबळा ठरला. त्यामुळेच ग्रीफिन जिमला पूर्वार्धातील आघाडी टिकविणे जमले नाही आणि पराभवाचा सामना करावा लागला.

या अगोदर झालेल्या उपांत्य सामन्यात गुड मॉर्निंग स्पोर्ट्सने अमर मंडळाला ४३-३१ असे, तर ग्रीफिन्स जिमने श्रीराम विश्वस्त संघाला ४३-३४ असे नमवीत अंतिम फेरी गाठली होती. उपांत्य उपविजयी दोन्ही संघाना प्रत्येकी चषक व १० हजार रुपये देऊन सन्मानित करण्यात आले. मनीष धनावडे व वेदान्त ढमाले हे ग्रीफिन्स जिमचे दोन्ही खेळाडू अनुक्रमे स्पर्धेतील उत्कृष्ट चढाई व पकडीचे खेळाडू ठरले. दोन्ही खेळाडूंना प्रत्येकी सायकल देऊन सन्मानित करण्यात आले.

# विश्वशांती गुरूकुलमध्ये वार्षिक क्रीडा महोत्सव उत्साहात

## सुवर्णपदक विजेती अर्णा पाटीलची उपस्थिती



**उरण : प्रतिनिधी**

उलवे येथील माईर्स एमआयटी विश्वशांती गुरूकुल स्कूलचा वार्षिक क्रीडा महोत्सव अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. ‘द जर्नी ऑफ नॉलेज अ‍ॅण्ड डिस्कव्हरी’ या संकल्पनेवर आधारित या क्रीडा महोत्सवातून शैक्षणिक गुणवत्ता आणि क्रीडाक्षमतेचा सुरेख संगम अनुभवायला मिळाला.

उझबेकिस्तान येथे झालेल्या १३व्या सीनियर आशियाई स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या व बहुपदक राष्ट्रीय खेळाडू अर्णा निखिल पाटील यांची या कार्यक्रमातील प्रमुख उपस्थिती उल्लेखनीय ठरली. कार्यक्रमाची सुरुवात आकाशात रंगी-बेरंगी फुगे सोडून करण्यात आली. त्यानंतर वर्षभरातील मासिक संकल्पनांवर आधारित आकर्षक थीम परेड सादर करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या अर्णा पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्याचे व त्यांच्या प्रभवी सादरीकरणाचे विशेष कौतुक केले. खेळातूनच शिस्त, संघभावना व नेतृत्वगुण विकसित होतात, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छाही दिल्या. मुख्याध्यापिका अंशू सक्सेना यांनी, जिथे धैर्य, चिकाटी आणि कौशल्याचा संगम होतो असा हा खेळ व्यक्तिमत्त्व घडविण्याचे उत्तम साधन असल्याचे सांगितले.

या वेळी विजेत्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते पदके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचा समारोप नेत्रदीपक जिम्नॅस्टिक्स व कॅलिस्थेनिक्सच्या सादरीकरणाने करण्यात आला.

# नव्या वर्षात कोहलीला खुणावताहेत तीन ‘विराट’ विक्रम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा सुपरस्टार विराट कोहलीने २०२५ या वर्षाचा शेवट अत्यंत धडाकेबाज कामगिरीने केला. आता २०२६ या नवीन वर्षात त्याच्यासमोर तीन मोठे विक्रम प्रस्थापित करण्याची सुवर्णसंधी चालून आली आहे.



आंतरराष्ट्रीय एकदिवसीय क्रिकेटच्या इतिहासात आतापर्यंत केवळ सचिन तेंडुलकरलाच १५ हजार धावांचा टप्पा ओलांडता आला आहे. सचिनने ४५२ सामन्यांत १८,४२६ धावा केल्या आहेत. आता कोहली हा टप्पा गाठणारा जगातील दुसरा फलंदाज बनण्याच्या उंबरठ्यावर आहे. त्याने आतापर्यंत २९६ डावांत १४,५५७ धावा केल्या आहेत. २०२६मधील सामन्यांचे वेळापत्रक पाहता कोहलीसाठी उर्वरित ४४३ धावा करणे फारसे कठीण जाणार नाही.

टी-२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर विराटचे पूर्ण लक्ष आता एकदिवसीय फॉरमॅटवर आहे. २०२६मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये (सर्व फॉरमॅट मिळून) सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत विराट दुसऱ्या क्रमांकावर पोहचू शकतो. यासाठी त्याला श्रीलंकेच्या कुमार संगकाराला मागे टाकावे लागेल. विराटने आतापर्यंत २७,६७५ धावा केल्या असून संगकाराचा विक्रम मोडण्यासाठी त्याला केवळ ४२ धावांची गरज आहे. ११ जानेवारीपासून न्यूझीलंडविरुद्ध सुरू होणाऱ्या मालिकेतच तो हा विक्रम आपल्या नावावर करू शकतो.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटव्यतिरिक्त जगातील सर्वात मोठ्या टी-२० लीगमध्ये म्हणजेच आयपीएलमध्येही विराट इतिहास घडवू शकतो. आयपीएलच्या आगामी १९व्या हंगामात विराटकडे नऊ हजार धावा पूर्ण करण्याची संधी आहे. सध्या तो आयपीएलमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या यादीत अव्वल स्थानी असून नऊ हजार धावांचा आकडा गाठण्यासाठी त्याला ३३९ धावांची आवश्यकता आहे. असा पराक्रम करणारा तो आयपीएल इतिहासातील पहिला फलंदाज ठरेल. विराटने २५९ डावांत ८,६६१ धावा केल्या आहेत.

दरम्यान, न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात मैदानात उतरताच विराट कोहली भारतासाठी सर्वाधिक एकदिवसीय सामने खेळण्याच्या बाबतीत माजी कर्णधार सौरव गांगुलीला मागे टाकेल. सध्या या दोन्ही दिग्गज खेळाडूंनी प्रत्येकी ३०८ सामने खेळले आहेत. भारतासाठी सर्वाधिक ४६३ एकदिवसीय सामने खेळण्याचा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर आहे.

### *दमदार फॉर्म, दरारा कायम!*

*भारतीय संघाचे सद्यस्थितीत पूर्ण लक्ष २०२६च्या सुरुवातीला होणाऱ्या टी-२० विश्वचषकावर आहे. त्यानंतर संघ २०२७च्या एकदिवसीय विश्वचषकाच्या तयारीला लागेल. या वर्षात टीम इंडियाला अनेक द्विपक्षीय एकदिवसीय मालिका खेळायच्या आहेत, ज्यामध्ये पुन्हा एकदा सर्वांच्या नजरा चांगल्या फॉर्ममध्ये असलेल्या विराट कोहली आणि रोहित शर्मावर असतील. २०२५मध्ये विराटने वनडे क्रिकेटमध्ये आपला जुना दरारा दाखवत अनेक विक्रम मोडले. आता २०२६मध्ये त्याच्याकडे दोन आंतरराष्ट्रीय व आयपीएलमधील मोठ्या यशांची प्रतीक्षा आहे.*

# श्रेयस अय्यरला ‘कमबॅक’साठी मान्यता



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा धडाकेबाज फलंदाज श्रेयस अय्यर दुखापतीतून पूर्णपणे बरा होऊन पुनरागमन करण्यास सज्ज झाला आहे. अय्यर विजय हजारे ट्रॉफीमध्ये मुंबईकडून पुढील सामना खेळेल. या सामन्यासाठी त्याला बीसीसीआयकडून परवानगी मिळाली आहे.

ऑस्ट्रेलियातील एकदिवसीय मालिकेदरम्यान अय्यरला दुखापत झाली होती. झेल घेण्यासाठी उडी मारली असताना त्याच्या स्नायूंना दुखापत झाली होती. त्यामुळे अंतर्गत रक्तस्त्रावही झाला होता. परिणामी तो दोन महिने खेळापासून दूर होता, परंतु आता तो पुनरागमनासाठी सज्ज झाला आहे.

दरम्यान, अय्यरच्या पुनरागमनामुळे ऋतुराज गायकवाडला धक्का बसू शकतो. गायकवाड सध्या अय्यरच्या जागी चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करत आहे, पण जर अय्यर तंदुरुस्त असेल तर गायकवाडला प्लेइंग इलेव्हनमधून वगळले जाऊ शकते.

**...तर न्यूझीलंडविरुद्ध संधी**

जर श्रेयस अय्यर ६ जानेवारी रोजी विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळत असेल, तर त्याला न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेसाठी संघातही स्थान मिळू शकते. तंदुरुस्तीच्या अधीन राहून अय्यरचा संघात समावेश होऊ शकतो. अय्यर ६ जानेवारी रोजी सामना फिटनेस चाचणी उत्तीर्ण झाल्यास न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत त्याचा सहभाग निश्चित होईल.

# ऑस्ट्रेलियाचा क्रिकेटर उस्मान ख्वाजा निवृत्त

**सिडनी :** ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर उस्मान ख्वाजाने शुक्रवारी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीचा निर्णय घोषित केला. त्याने इंग्लंडविरूद्धच्या पाचव्या आणि शेवटच्या अ‍ॅशेस कसोटीनंतर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त होणार असल्याचे जाहीर केले. उस्मान ख्वाजा हा ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघातील पहिला मुस्लीम कसोटी क्रिकेटपटू होता. त्याने त्याच्या १५ वर्षाच्या कारकीर्दित वंशभेदाची पारंपरिक चौकट मोडून काढली होती.



जर उस्मान ख्वाजाची अ‍ॅशेस मालिकेतील शेवटच्या कसोटी सामन्यासाठी प्लेईंग ११मध्ये निवड झाली तर तो ऑस्ट्रेलियाकडून शेवटचा फलंदाजीसाठी उतरणार आहे. सिडनी क्रिकेट ग्राऊंड हे त्याच्यासाठी खास ग्राऊंड ठरण्याची शक्यता आहे.

# स्टार फलंदाज साई सुदर्शन दुखापतग्रस्त

## गुजरात टायटन्सच्या गोटात चिंतेचे वातावरण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६च्या रणधुमाळीपूर्वी गुजरात टायटन्सच्या गोटात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. संघाचा युवा आणि आक्रमक फलंदाज साई सुदर्शन विजय हजारे ट्रॉफीमध्ये खेळताना दुखापतग्रस्त झाला असून त्याला उर्वरित स्पर्धेतून बाहेर पडावे लागले आहे.

विजय हजारे ट्रॉफी २०२५-२६ अंतर्गत तामिळनाडू विरुद्ध मध्य प्रदेश या सामन्यादरम्यान सुदर्शनला ही दुखापत झाली. ५१ धावांच्या खेळीदरम्यान धावबाद होण्यापासून वाचण्यासाठी त्याने मारलेल्या डाईव्हमुळे त्याच्या उजव्या बरगडीला



मार लागला. सीटी स्कॅनमध्ये त्याच्या उजव्या बाजूच्या सातव्या बरगडीला फ्रॅक्चर झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

या दुखापतीमुळे सुदर्शनने कर्नाटक आणि झारखंडविरुद्धच्या सामन्यांत सहभाग घेतला नाही. सध्या तो बंगळुरू येथील बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सिलेंसमध्ये वैद्यकीय पथकाच्या देखरेखीखाली उपचार घेत आहे.

साई सुदर्शनचे पुनर्वसन सुरू झाले असून सध्या तो लोअर-बॉडी फिटनेस आणि कंडिशनिंगवर लक्ष केंद्रित करत आहे. बरगडीची दुखापत पूर्णपणे बरी व्हावी यासाठी सध्या शरीराच्या वरच्या भागाचा कोणताही व्यायाम टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे. येत्या ७ ते १० दिवसांत वेदना कमी झाल्यानंतर तो स्ट्रेंथ ट्रेनिंग सुरू करण्याची शक्यता आहे.

**आयपीएलपूर्वी तंदुरूस्तीची शक्यता**

जरी सुदर्शन विजय हजारे ट्रॉफी आणि रणजी ट्रॉफीच्या आगामी काही सामन्यांना मुकणार असला तरी गुजरात टायटन्ससाठी एक समाधानाची बाब समोर आली आहे. हे फ्रॅक्चर गंभीर नसून हाडे आपल्या जागेवरून हललेली नाहीत, त्यामुळे शस्त्रक्रियेची गरज भासणार नाही. वैद्यकीय अंदाजानुसार आयपीएल २०२६ सुरू होण्यापूर्वी तो पूर्णपणे तंदुरूस्त होऊन मैदानात पुनरागमन करेल आणि २०२६च्या हंगामात खेळण्यासाठी उपलब्ध राहण्याची शक्यता आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com